cmyk

दैनिक
# राज्य लोकतंत्र

www.epaper.rajyaloktantra.com नवी दिशा... नवे विचार..... email:rajyaloktantra75@gmail.com

बीड – महाराष्ट्र | वर्ष–५ | अंक–७५ | गुरूवार, दि.१० जुलै २०२५ | RNI No.: MAHMAR/2021/85884 | NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 | पाने–६ | किंमत ३ रूपये

## संपादकीय

### राज्यात ‘मेगा भरती’!

राज्यात विविध सरकारी विभागांमधील रिक्त पदांची भरती लवकरच करण्यात येणार असून, यासाठी ‘मेगा भरती’ जाहीर होणार असल्याची माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विधानसभेत दिली. विविध शासकीय पदांच्या भरतीसंबंधीचा जुना आकृतिबंध आणि जुने नियुक्ती नियम यात आगामी दीडशे दिवसांच्या उद्दिष्ट कार्यक्रमांतर्गत सुधारणा करून या रिक्त पदांसाठी राज्य शासन ‘मेगा भरती’ करणार असल्याची घोषणा मुख्यमंत्र्यांनी विधानसभेत लक्षवेधी सूचनेच्या उत्तरात केली.

### शालेय शिक्षणमंत्र्यांची दादागिरी?

नाशिक : राज्यात सध्या शालेय शिक्षणावरुन बराच गदारोळ सुरु आहे. मराठीच्या शाळा बंद होत आहेत, हिंदी भाषेची सक्ती केली जात असल्याचे मुद्द्यांमुळे तणावाची परिस्थिती निर्माण झाली आहे. शालेय शिक्षण मंत्री दादा भुसे यांच्या दादागिरीची सध्या चर्चा सुरु आहे. इथल्या एका महापालिकेच्या बंद पडलेल्या मराठी शाळेत शालेय शिक्षण मंत्र्यांच्या कार्यालयाचा प्रस्ताव ठेवण्यात आला आहे. महापालिका आयुक्त मनिषा खत्री यांनी या प्रस्तावाची माहिती दिली आहे, त्यामुळे दादा भुसे चांगलेच अडचणीत आले आहेत.

# तुकडा बंदी कायदा रद्द!

## राज्य सरकारचा शेतकऱ्यांसाठी ऐतिहासिक निर्णय

**मुंबई । प्रतिनिधी**

**राज्य सरकारने मोठा निर्णय घेतला आहे, आज विधानसभेत मोठी घोषणा करण्यात आली, लाखो शेतकऱ्यांना या निर्णयामुळे दिलासा मिळणार आहे. बऱ्याच दिवसापासून चर्चेत असलेला तुकडा बंदी कायदा अखेर राज्य सरकारने रद्द केला आहे. याबाबत महसुल मंत्री चंद्रशेखर बावन्नकुळे यांनी विधानसभेत घोषणा केली आहे.**

गेल्या अनेक दिवसांपासून तुकडा बंदी कायदा रद्द करण्यात यावा, अशी मागणी सुरू होती. अखेर हा कायदा आता सरकारने रद्द केला आहे. विधानसभेत या संदर्भात घोषणा करण्यात आली आहे. या संदर्भात घोषणा करताना लवकरच आम्ही एक एसओपी या संदर्भात जारी करू, ज्यामुळे सामान्य शेतकऱ्यांचे काम अधिक

पान २ वर



### नेमकं काय म्हणाले बावनकुळे?

तुकडे बंदी कायदा आम्ही रद्द करत आहोत, लवकरच आम्ही त्या संदर्भातील नोटिफिकेश आम्ही काढणार आहोत, लवकरच या कायद्यामध्ये आम्ही बदल करणार आहोत. आम्ही या कायद्यासंदर्भातील सर्व बंधण मुक्त करत आहोत, लवकरच आम्ही एक एसओपी या संदर्भात जारी करू, ज्यामुळे सामान्य शेतकऱ्यांचे काम अधिक सोप होईल, त्यांना सरकार दरबारी हेलपाटे मारण्याची गरज राहणार नाही असे बावनकुळे यांनी म्हटले आहे.

## थोडक्यात...

### संजय गायकवाड यांनी केलेली मारहाण चुकीची–फडणवीस

मुंबई–संजय गायकवाड यांनी केलेल्या मारहाणीवर फडणवीसांनी प्रतिक्रिया दिली आहे. आमदाराने असे मारहाण करणे चुकीचे आहे. त्याने चुकीचा संदेश जातो, असे म्हणत फडणवीसांनी संजय गायकवाडांच्या कृतीवर नाराजी व्यक्त केली आहे.

### शिक्षकांना सन्मानाची भूमिका शासनाने घ्यावी–शरद पवार

मुंबई–शिक्षकांवर मागण्यांसाठी संघर्ष करण्याची वेळ. शिक्षकांवर इतर सरकारी कामांचीही जबाबदारी असते. शिक्षकांना सन्मान मिळावा अशी भूमिका शासनाने घेतली पाहिजे असे मत शरद पवार यांनी व्यक्त केले आहे. शिक्षक आंदोलनाला भेट दिल्यावर ते बोलत होते.

### आमदारांना ५० कोटी मिळालेत, ठेकेदारांना नाहीत–संजय राऊत

मुंबई–फक्त आमदारांना ५० कोटी मिळाले आहेत. ठेकेदारांना ५० कोटी मिळालेले नाहीत. कॅन्टीनमध्ये भ्रष्टाचार आहे. टॉवेलवर जाऊन मारहाण करायची. मी आज सीएमना ट्विटरच्या माध्यमातून कळवले आहे. ही आपल्या राज्यातील कायदा–सुव्यस्था आहे, अशी टीका संजय राऊत यांनी केली आहे.

### पावसाच्या विश्रांतीनंतर गोदावरीचा पूर ओसरला

नाशिक –जिल्ह्यात पावसाने विश्रांती घेतल्यामुळे गोदावरी, दारणा आणि कादवा नदीचा पूर ओसरला आहे. मात्र पुराचे पाणी दाखल होत असल्याने निफाड तालुक्यातील नांदूर मधमेश्वर धरणातून ३२ हजार ९६० क्यूसेक पाण्याचा विसर्ग करण्यात आला. या पावसाच्या हंगामात नांदूर मधमेश्वर धरणातून आज सकाळी सहा वाजेपर्यंत २८ टीएमसी पाण्याचा जायकवाडीच्या दिशेने गोदावरी नदी पात्रात विसर्ग करण्यात आला.

## एसबीआयकडून ९६ हजार कोटी कर्जवसुलीवर पाणी




**मुंबई । प्रतिनिधी**

**गेल्या आठ वर्षांमध्ये राष्ट्रीय कंपनी कायदा लवादाकडे २७९ कर्जवसुली प्रकरणे नेल्यानंतरही स्टेट बँकेला १ लाख ४४ हजार ९६७ कोटी रुपयांच्या दाव्यांपैकी ९६ हजार ५८८ कोटी रुपयांच्या रक्कमेवर कायमचे पाणी सोडावे लागले आहे.**

एसबीआय बँकेला ९६ हजार कोटी कर्ज वसुलीवर पाणी सोडावे लागले असून या कर्जबुडव्यांची नावे जाहीर करायला बँकेने नकार दिल्याची धक्कादायक बाब समोर आली आहे. त्यात १०० कोटींपेक्षा जास्त रकमेचे कर्ज थकबाकीदारही असल्याचे आढळून आले आहे. स्टेट बँकेचे भागधारक असलेले विवेक वेलणकर

पान २ वर

## शिवसेना ठाकरे गट अन् मनसेच्या युतीवर बोलू नका

### राज ठाकरेंचा आदेश; उठसुट बोलणाऱ्यांच्या तोंडाला कुलूप लागणार



**मुंबई । प्रतिनिधी**

**शिवसेना ठाकरे गट आणि मनसे यांच्या युती संदर्भात कोणीही बोलू नये, असे आदेश मनसेप्रमुख राज ठाकरे यांनी पक्षाच्या पदाधिकाऱ्यांना दिले आहेत. त्यामुळे युतीबाबत उठसुट बोलणाऱ्यांच्या तोंडाला कुलूप लागणार आहे. तसेच राज ठाकरेंच्या या वक्तव्याने युतीबाबत संभ्रम निर्माण झाला आहे.**

### उध्दव ठाकरेंची प्रतिक्रिया



राज ठाकरेंच्या या आदेशावर विचारण्यात आले. यावर चांगलंय ना...त्याच्यात काय, ते बोलतील ना त्यावर...अशी प्रतिक्रिया उद्धव ठाकरेंनी दिली आहे. उद्धव ठाकरे आज विधानभवनात आले होते. त्यावेळी त्यांनी माध्यमांशी संवाद साधला.

गेल्या काही दिवसापासून मनसे आणि ठाकरे सेनेच्या युतीबाबत पदाधिकारी, नेते आणि

पान २ वर

## महाराष्ट्रानंतर बिहारमध्येही निवडणूक चोरण्याचा प्रयत्न

### राहुल गांधींचा गंभीर आरोप

**पाटणा। प्रतिनिधी**

**महाराष्ट्र प्रमाणे बिहारमध्येही निवडणूक चोरी सुरु असल्याचा गंभीर आरोप लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी केला आहे. बिहारमधील पाटणा येथे झालेल्या महाआघाडीच्या निषेधात राहुल गांधी सहभागी झाले होते. त्यावेळी ते बोलत होते.**

बिहारमधील मतदार याद्यांच्या तपासणीला विरोधी पक्ष विरोध करत आहेत. राहुल गांधी यांनी आरोप केला की, ज्याप्रमाणे महाराष्ट्राच्या निवडणूक चोरीला गेल्या त्याचप्रमाणे बिहारच्या निवडणुका चोरण्याचा प्रयत्न केला जाईल. ते म्हणाले की, निवडणूक आयुक्त भाजप आणि आरएसएस नेत्यांसारखे बोलतात. त्यांना (भाजपला) कळले आहे की आम्हाला महाराष्ट्र मॉडेल समजले आहे, त्यांनी आता बिहार मॉडेल आणले आहे. गरिबांची मते हिसकावून

पान २ वर

## शिक्षकांसमोर सरकार झुकले

### सर्व मागण्या मान्य; मंत्री गिरीष महाजनांची माहिती

**मुंबई । प्रतिनिधी**

**मुंबईतील आझाद मैदानावर चार दिवसांपासून विनाअनुदानित शिक्षकांचे आंदोलन सुरु होते. आता या आंदोलनाला यश आले आहे. सरकारने या शिक्षकांच्या सर्व मागण्या मान्य केल्या आहेत. मंत्री गिरीश महाजन यांनी आंदोलनस्थळी शिक्षकांनी भेट घेतली त्यानंतर बोलताना त्यांनी शिक्षकांच्या सर्व मागण्या सरकारने मान्य केल्या असल्याची घोषणा केली.**



राज्यातील शिक्षकांनी आपल्या विविध मागण्यांसाठी चार दिवसापासून आंदोलन सुरु केले आहे. अगोदर रोहित पवार आणि त्यानंतर दि. ९ जुलै रोजी शरद पवार यांनी आंदोलनस्थळी जाऊन शिक्षकांची भेट घेतली. यावेळी त्यांच्याशी चर्चा करुन पाठींबा दर्शवला. त्यामुळे सरकारला जाग आली आणि मंत्री गिरीष महाजन यांना आंदोलनकर्त्यांना

पान २ वर

### या तारखेला पगार मिळणार

पुढे बोलताना महाजन म्हणाले की, ‘आता तुमच्या पगाराचा प्रश्न मार्गी लागलेला आहे. तुमच्या शिक्षकांच्या संघटनेच्या पदाधिकाऱ्यांसोबत झालेल्या बैठकीत हे ठरले की, आम्हाला तुमच्या खात्यात पगार टाकायचाच आहे. या दोन–तीन दिवसात सर्व तांत्रिक बाजू समजावून घेऊन, येत्या १८ तारखेला अधिवेशन संपल्यावर तुमच्या खात्यात पैसे आलेले असतील. यात कोणताही बदल होणार नाही, असे महाजन म्हणाले.



## भारतीय हवाई दलाचे लढाऊ विमान कोसळले

### २ वैमानिकांचा मृत्यू

**जयपूर । वृतसंस्था**

**राजस्थानच्या चुरु जिल्ह्यात वायूसेनेच्या एका विमानाचा मोठी दुर्घटना झाली आहे. रतनगडच्या भानुदा गावात हवाई दलाचे लढाऊ विमान कोसळले आहे. या अपघातात दोन वैमानिकांचा मृत्यू झाला आहे.**

भारतीय हवाई दलाचे विमान चुरु परिसरात अचानक कोसळले. विमान जमीनीवर कोसळताच मोठा आवाज झाला आणि विमानाने पेट घेतल्याचे म्हटले जात आहे. अपघाताची माहिती मिळताच पोलीस घटनास्थळी

पान २ वर

## कागदपत्रे अडवली तर कार्यालयांना घेराव घालणार

### जरांगे पाटील पुन्हा कडाडले, सरकारला दिला नवा इशारा

**धाराशिव । प्रतिनिधी**

**आमचे कागदपत्रे आडवली तर शासकीय कार्यालयांना आम्ही घेराव घालणार असल्याचा इशारा मनोज जरांगे पाटील यांनी धाराशिव जिल्ह्यातील एका बैठकीतून दिला आहे.**

मनोज जरांगे पाटील यांनी मराठा आरक्षणाच्या मुद्द्यावर पुन्हा एकदा सरकारला इशारा दिला आहे, ते धाराशिव जिल्ह्याच्या दौऱ्यावर असताना बोलत होते. येत्या २९ ऑगस्टला मनोज जरांगे पाटील यांच्या नेतृत्वात हा मराठी समाजाचा मोर्चा मुंबईमध्ये धडकणार आहे. २७ ऑगस्टला हा मोर्चा अंतरवाली सराटी येथून निघणार आहे. त्यानंतर तो २९ ऑगस्ट रोजी मुंबईत पोहोचणार आहे. दरम्यान आता या मोर्चाची तयारी सुरू आहे. मोर्चाच्या पार्श्वभूमीवर मनोज जरांगे पाटील हे चावडी बैठका

पान २ वर



## पावसाच्या खंडामुळे झालेल्या पिकांच्या नुकसानीचे पंचनामे करा

### आ.क्षीरसागरांची प्रशासनाकडे मागणी

**बीड । प्रतिनिधी**

जुन आणि जुलै महिन्यात म्हणजेच ऐन पावसाळ्यातच पाऊस अचानक बंद झाल्याने शेतकऱ्यांनी पेरणी केलेल्या पिकांचे पूर्णतः नुकसान झाले आहे. त्यामुळे शेतकरी बांधवांवर दुबार पेरणीचे संकट येऊन ठेपले आहे. त्यामुळे शेतकरी मोठ्या अडचणीत सापडला आहे.

बीड विधानसभा क्षेत्रातील बीड शहर, बीड ग्रामीण व शिरूर कासार तालुक्यात आणि एकूण बीड जिल्ह्यातच पावसाळ्याच्या सुरुवातीपासूनच पावसाने दडी मारली.

पान २ वर



## बाजारभाव

कृषि उत्पन्न बाजार समिती, बीड, दि.०९ जुलै २०२५

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

| | किमान | कमाल | सरासरी |
|---|---|---|---|
| गहू: ४४.५० क्विंटल | २,१०० | २,५३४ | २,३९४ |
| ज्वारी/हायब्रिड: ३९.०० क्विंटल | २,१५० | २,९०० | २,५३५ |
| मका/लोकल: २.५०क्विंटल | २,३०० | २,३०० | २,३०० |
| तूर : ०.५० क्विंटल | ६,००० | ६,००० | ६,००० |
| उडीद : १.५० क्विंटल | ४,४०० | ४,८०० | ४,६०० |
| बाजरी: २७.५० क्विंटल | २,३३१ | २,७८० | २,६०५ |
| मुग :१.०० क्विंटल | ५,००० | ६,२०० | ५,६०० |
| सोयाबीन: १४.०० क्विंटल | ३,७०१ | ४,२२५ | ३,९६३ |
| हरभरा: ९.५० क्विंटल | ५,४४० | ५,४६० | ५,४५३ |

# शेतकरी कर्जमाफीसाठी लाठीकाठी, रुमणे हाती घ्या

## बच्चू कडूंचे शेतकऱ्यांना आवाहन; अधिवेशन काळात निघणार शेतकरी यात्रा

**मुंबई । प्रतिनिधी**

शेतकरी कर्जमाफीसह इतर प्रश्नांसाठी उपोषण केले, त्यावेळी १५ दिवसात समाधानकारक निर्णय घेण्याचे आश्वासन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले होते. आता २० दिवस झाले तरी काहीच निर्णय झाला नाही. त्यामुळे आम्ही अधिवेशन काळात शेतकरी यात्रा काढणार आहोत. शेतकऱ्यांनी यावेळी लाठीकाठी, रुमणे घेऊन एकजूट करुन सरकारला हिसका दाखवा, असे आवाहन बच्चू कडू यांनी केले आहे.



### कर्जमाफी करा, आम्ही खांद्यावर घेऊन नाचू

राज्य सरकारने जर आमच्या मागण्या या अधिवेशनात मार्गी लावल्या. शेतकरी कर्जमाफी जाहीर केली तर आम्ही सरकारमधील सर्वच मंत्र्यांना खांद्यावर घेऊन नाचू असेही बच्चू कडू म्हणाले.

यावेळी पुढे बोलताना बच्चू कडू म्हणाले, या सगळ्या भर पावसापेक्षा आणि आमच्या वेदनेपेक्षा शेतकऱ्याच्या वेदना याच्यापेक्षा जास्त आहे. तडप तळप जे मारल्या जाते, त्याचे मरण खऱ्या अर्थाने आम्हाला वाचवाच आहे आणि आमचा उद्देश सफल होत आहे म्हणजे एका बाजून राष्ट्रवादी पवार साहेबाच्या कार्यकर्ता असतात,

पान २ वर

cmyk

## अग्रलेख

# राज्यात 'मेगा भरती'!

राज्यात विविध सरकारी विभागांमधील रिक्त पदांची भरती लवकरच करण्यात येणार असून, यासाठी 'मेगा भरती' जाहीर होणार असल्याची माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विधानसभेत दिली. विविध शासकीय पदांच्या भरतीसंबंधीचा जुना आकृतिबंध आणि जुने नियुक्ती नियम यात आगामी दीडशे दिवसांच्या उद्दिष्ट कार्यक्रमांतर्गत सुधारणा करून या रिक्त पदांसाठी राज्य शासन 'मेगा भरती' करणार असल्याची घोषणा मुख्यमंत्र्यांनी विधानसभेत लक्षवेधी सूचनेच्या उत्तरात केली. आमदार भीमराव केराम यांनी मंत्रालयात आदिवासींच्या विविध विभागांतील राखीव ५० जागा बिगर आदिवासींनी बळकावल्या असल्याचे लक्षात आले असून अवर सचिव, कक्ष अधिकारी, सहाय्यक कक्ष अधिकारी, लिपिक, टंकलेखक, उच्च श्रेणी लघु टंकलेखक आदी पदांवर हे अधिकारी आणि कर्मचारी काम करत असल्याचे लक्षवेधी सूचनेच्या माध्यमातून सभागृहाच्या निदर्शनास आणले.

या चर्चेत डॉ. नितीन राऊत, नाना पटोले, भास्कर जाधव, सुरेश धस यांनीही उपप्रश्न उपस्थित करत सहभाग घेतला. चर्चेला उत्तर देताना मुख्यमंत्री म्हणाले की, जात वैधता प्रमाणपत्राशिवाय कोणालाही राखीव जागांवर सेवेत घेतले जात नाही. या संदर्भात न्यायालयाच्या निर्णयानुसार ज्यांचे प्रमाणपत्र अवैध ठरलेले आहे, त्यांना त्यांची नियुक्ती रद्द न करता, अधिसंख्य पदावर नियुक्ती देण्यात आली आहे. मागील काळात शासनाने ७५ हजार पदभरतीचा कार्यक्रम जाहीर केला होता. त्यानुसार एक लाखांपेक्षा जास्त पदांची भरती करण्यात आली. राज्यात अनुसूचित जमाती प्रवर्गातील ६८६० पदांवर जात वैधता प्रमाणपत्र सादर न करू शकलेले कार्यरत आहेत. मात्र त्यांना २० वर्षे किंवा त्यापेक्षा जास्त कालावधी झालेला आहे. अशा पदांबाबत शासनाने मानवतापूर्ण दृष्टीने विचार करीत ही पदे अधिसंख्य केली. या पदांवर कार्यरत असलेल्यांना बढती मिळणार नाही. पण शासन त्यांना पदावरून कमीही करणार नाही. त्यांचा कार्यकाळ संपल्यानंतर ही पदे व्यपगत होतील. सध्या बेरोजगारी ही देशापुढील सर्वांत मोठी समस्या आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी दोन वर्षांत साडेतीन कोटी नोक-या देण्याचे नवे आश्वासन दिले आहे. मोदी यांच्या अध्यक्षतेखाली केंद्रीय मंत्रिमंडळाची नुकतीच एक बैठक पार पडली. त्यात सर्व क्षेत्रांत, विशेषत: उत्पादन क्षेत्र, नोक-यांची निर्मिती, रोजगाराच्या संधीचा विस्तार वगैरे योजनांना मंजुरी देण्यात आली. सरकार बरेच काही ठरवते पण या ठरवण्यावर ते ठाम राहिले असते तर गत दहा वर्षांत देशाचा कायापालट झाला असता. जिकडे तिकडे मोदींच्या नावाचा उदो उदो झाला असता. २०१४ मध्ये सत्तेवर आल्यानंतर मोदी यांनी दरवर्षी दोन कोटी रोजगार अथवा नोक-या उपलब्ध करून देऊ असे म्हटले होते. पाच वर्षांत दहा कोटी लोकांना रोजगार देण्याचा त्यांचा संकल्प होता. मोदी यांचा सध्या तिसरा कार्यकाल सुरू आहे. पहिल्या दोन कार्यकालात किमान दहा कोटी लोकांना नोक-या मिळायला हव्या होत्या. ते घडले नाही आणि आता तिस-या कार्यकालात एक वर्ष उलटल्यानंतर दोन वर्षांत साडेतीन कोटी नोक-या देण्याचे गाजर दाखवण्यात आले आहे. रोजगारकर्त्यांना उत्तेजन मिळावे म्हणून केंद्र सरकारने एक लाख कोटी रुपयांची तरतूद असलेल्या रोजगाराशी संबंधित प्रोत्साहन योजनेला मंजुरी दिली. त्या माध्यमातून आगामी दोन वर्षांत साडेतीन कोटींहून अधिक नोक-या निर्माण होतील असा अंदाज आहे. पण गत दहा वर्षांत किती रोजगार दिला, आश्वासने पूर्ण केली यावर मोदी काहीच बोलत नाहीत. देशातील ८० कोटी जनता मोफत रेशनवर जगते आहे. आर्थिक तंगी, सावकारी, महागाई, बेरोजगारी यामुळे आत्महत्यांचे प्रमाण वाढत आहे आणि मोदी सरकार जीडीपी, चार-पाच ट्रिलियन डॉलर्स अर्थव्यवस्था यावर गप्पा मारतेय! जीडीपीचे आकडे व कोट्यवधी बेरोजगारांचे आकडे यांचा मेळ बसत नाही. सध्या देश इतिहासातील सर्वांत भयंकर रोजगारीशी सामना करत आहे. नोटबंदीसारख्या निर्णयाने लाखो लोकांना नोक-या गमवाव्या लागल्या. 'अग्निवीर'सारख्या योजनांनी बेरोजगार युवक आणि सैन्यदलाची थट्टा उडवली गेली. रेल्वे, बँका, एलआयसी, सार्वजनिक उपक्रमातून नोक-यांची पीछेहाट सुरू आहे. नागरी विमानक्षेत्रही कोसळले आहे. किंगफिशर, जेट, गो एअर सारख्या विमान कंपन्या बंद पडल्या की पाडल्या? कृषी क्षेत्र हे सर्वांत जास्त रोजगार देणारे क्षेत्र होते, तेथेही आता सर्वकाही बेभरवशाचे झाले आहे. शेती करायला तरुणाई तयार नाही. दुष्काळ, अवकाळी, शेतमालास हमीभाव नाही त्यामुळे या क्षेत्रावर कायम संकट आहे. मोदी सरकारचा कल फुकट धान्य, बेकार भत्ता, लाडक्या बहिणींना मासिक भत्ता अशा फुकट गोष्टींकडे आहे. त्यामुळे हा वर्ग मोदींना देव मानेल व भाजपचा गुलाम बनेल अशी एकूण योजना आहे. आज ९ जुलै रोजी देशभरात २५ कोटींहून अधिक कर्मचारी देशव्यापी संपावर जाणार आहेत. केंद्र सरकारच्या शेतकरी, किसान आणि राष्ट्रविरोधी धोरणांच्या विरोधात १० केंद्रीय कर्मचारी संघटना आणि त्यांच्या सहकारी संस्थांनी हा 'भारत बंद' पुकारला आहे. बँकिंग, विमा, कोळसा खाणकाम, रस्ते, बांधकाम आणि इतर अनेक क्षेत्रातील कर्मचारी या संपात सहभागी होणार असून यामुळे देशातील अत्यावश्यक सेवा ठप्प होण्याची शक्यता आहे. महाराष्ट्रात राज्य शासनाने सर्व विभागांना १५० दिवसांचा उद्दिष्टांचा कार्यक्रम दिला आहे. या कार्यक्रमांतर्गत आकृतिबंध, नियुक्ती नियम सुधारित करणे, अनुकंपा तत्त्वावरील भरती १०० टक्के करणे आदी उद्दिष्टे दिली आहेत. या उद्दिष्टपूर्तीनंतर रिक्त पदांची निश्चित माहिती समोर आल्यावर या रिक्त पदांसाठी राज्य शासन मेगा भरती करेल, असे आश्वासन मुख्यमंत्र्यांनी विधानसभेत दिले आहे. तोवर जनतेने आश्वासनांचे गाजर चघळायला हरकत नाही!

# तलवार इंस्टाग्राम व मिडीयावर टाकून व्हिडीओ व्हायरल

## दहशत निर्माण केल्याप्रकरणी दोघांना अटक

**जालना । प्रतिनिधी**

जालना जिल्हयात अवैध शस्त्रे बाळगणाऱ्या इसमांची माहिती घेऊन कारवाई करणेबाबत मा. पोलीस अधीक्षक श्री. अजयकुमार बंन्सल यांनी स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक श्री. पंकज जाधव यांनी स्थागुशाचे पथक तयार करुन कारवाई करण्याबाबत मार्गदर्शन केले होते. त्याअनुषंगाने दिनांक ०९/०७/२०२५ रोजी अवैध शस्त्र बाळगणाऱ्या इसमांचा शोध घेत असतांना गुप्त बातमीदारामार्फत माहिती मिळाली की, संभाजी सुभाष जरहाड, रा. काटखेडा, ता.अंबड याने इंस्टाग्राम सोशल मिडीया साईटवर एक तलवारीसह व्हिडीओ तयार करुन व्हायरल



करुन लोकांमध्ये दहशत निर्माण केली आहे. त्यानुषंगाने संभाजी येथुन ताब्यात घेवुन त्याकडे तलवारीच्या अनुषंगाने विचारणा करता त्याने सदरची तलवार त्याचा मित्र विशाल बाबासाहेब धोंगडे, वय २३ वर्ष, रा. चौधरीनगर, ता.जि. जालना मूळगांव-भिलपुरी, ता. जि.जालना याकडुन आणून व्हिडीओ तयार केला व त्यास परत केल्याचे सांगितले. त्यानुसार विशाल धोंगडे यास चौधरीनगर ता. जि. जालना येथुन ताब्यात घेवुन त्याकडे तलवारीबाबत विचारणा करता त्याने तलवार काढुन दिल्याने ती तपासकामी जप्त करुन दोन्हीही आरोपीतांविरुध्द सरकारतर्फे फिर्यादीवरुन तालुका पोलीस ठाणे, जालना येथे कलम ४,२५ भा.ह.का. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदरची कारवाई स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक श्री. पंकज जाधव, पोउपनि श्री राजेंद्र वाघ, पोलीस अंमलदार सागर बाविस्कर, देविदास भोजने, इरशाद पटेल, संदीप चिंचोले, सतिष श्रीवास, भागवत खरात, अशोक जाधवर सर्व स्था.गु.शा. जालना यांनी केली आहे.

# कामगार शेतकरी विरोधी धोरणांच्या निषेधार्थ इंटक व ईपीएस ९५ कर्मचाऱ्यांचे धरणे आंदोलन

**बीड । प्रतिनिधी**

सरकारच्या कॉर्पोरेट समर्थक ,कामगार विरोधी आणि शेतकरी विरोधी धोरणा विरुद्ध विविध १० केंद्रीय कामगार संघटनेच्या वतीने दि. ९ जुलै २०२५ बुधवार रोजी सेवानिवृत्त ईपीएस ९५ कर्मचारी समन्वय समिती बीड व इंटक काँग्रेस संघटना बीडच्या वतीने जिल्हाधिकारी कार्यालयासमोर भारत बंदला पाठिंबा देत सरकारच्या विरोधात, कामगार आणि शेतकरी विरोधी धोरणे राबवणाऱ्या सरकारचा धिक्कार असो, कामगार एकजुटीचा विजय असो, शेतकरी व कामगार विरोधी धोरण रद्द करा अशा घोषणा देऊन निदर्शन करण्यात आली .यावेळी इंटक काँग्रेस व सेवानिवृत्त ईपीएस ९५ कर्मचारी समन्वय समितीच्या वतीने पंतप्रधान व केंद्रीय कामगार मंत्री यांना जिल्हाधिकारी कार्यालयामार्फत कामगार व शेतकऱ्यांच्या विविध मागण्यांबाबत निवेदन देण्यात आले. सेवानिवृत्त ईपीएस ९५ कर्मचारी समन्वय समितीच्या वतीने ईपीएस ९५ पेन्शन धारकांना ९ हजार रुपये व अधिक महागाई भत्ता देण्यात यावा, नसता डिसेंबर




२०२५ महिन्यात दिल्ली येथील जंतर-मंतर मैदानात सेवानिवृत्त कर्मचारी १९९५ समन्वय राष्ट्रीय समितीच्या वतीने डिसेंबर २०२५ महिन्यात दिल्ली येथील जंतर-मंतर मैदानात मोठे धरणे आंदोलन करण्यात येईल असा इशारा पंतप्रधान नरेंद्र मोदी व केंद्रीय श्रम आणि रोजगार मंत्री मनसुख मांडवीया यांना जिल्हाधिकारी कार्यालय मार्फत पाठवलेल्या वेगळ्या निवेदनाद्वारे केली आहे .यावेळी निवृत्त कर्मचारी ईपीएस ९५ समन्वय समितीचे जिल्हाध्यक्ष डॉ. संजय तांदळे, डी आर शेवलीकर ,सुदाम कोळेकर भाऊसाहेब फुंदे, सुधीर देशमुख रणजीत डावकर, इटक काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष रामधन जमले, सखाराम बेंगडे ,एस आरेकर, मधुसूदन मस्के, हनुमान जगताप हनुमान घोडके भीमराव कुटी बीड शहर मंचचे जिल्हाध्यक्ष नितीन जायभाये, शेख अमीर पाशा ,सौ. गिरी मॅडम आदींची उपस्थिती होती.

# विज्ञान शिक्षक,युवा विज्ञान प्रसारक प्रशिक्षण शिबीराचा समारोप

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

**मराठी विज्ञान परिषद, पू.बाबासाहेब परांजपे विज्ञान केंद्र, योगेश्वरी महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित विज्ञान शिक्षक, प्रयोगशाळा सहाय्यक प्रशिक्षण कार्य शाळा, शनिवारी विज्ञानवारी अंतर्गत युवा विज्ञान प्रसारक प्रशिक्षणाचा रविवारी समारोप करण्यात आला. अध्यक्षस्थानी म.वि. परिषदेच्या अंबाजोगाई शाखेचे सचिव प्रा. भीमाशंकर शेटे होते. मंचावर म.वि.परिषद मुंबईचे पदाधिकारी प्रकाश मोडक,अभय यावलकर,मनस्विनी प्रकल्पच्या प्रा.अरुंधती पाटील,प्रा.अनिल नरसिंगे होते.**

मराठी विज्ञान परिषद ही विज्ञानाच्या प्रसार व प्रचाराचे काम करते शनिवारी विज्ञानवारीच्या माध्यमातून विद्यार्थ्यांनी विद्यालयात जाऊन विज्ञान विद्यार्थ्यांपर्यंत पोहचवावे जेणे करून विज्ञान त्यांच्या जगण्यात येऊन त्याचा प्रचार,प्रसार वेगाने होईल.अभय यावलकर म्हणाले की,चांगले पेरले तर चांगले उगवते तसे विज्ञान विषयाचे काम आहे.प्रत्येक गोष्टीत विज्ञान आहे पण ते विद्यार्थ्यांनी चिकित्सक पद्धतीने पाहून त्याचा संशोधक वृत्तीने अभ्यास करणे गरजेचे आहे.अरुंधती पाटील यांनीही उपस्थित विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. प्रशिक्षणार्थी विद्यार्थ्यांनीही मनोगत व्यक्त केले. प्रशिक्षणा साठी परिश्रम घेण्याऱ्यांचे स्वागत करण्यात आले. पू.बाबासाहेब परांजपे यांच्या मार्गदर्शनातून योगेश्वरी विज्ञान महाविद्यालयाची स्थापना झाली आणि ग्रामीण भागात विज्ञानाचा प्रसार प्रचार होऊ लागला विद्यार्थी शिकु लागले. विज्ञान विषयाची गोडी निर्माण करण्याची निकड लक्षात घेऊन विद्यार्थ्यांनी विद्यालयात शनिवारी विज्ञान वारी अंतर्गत अध्यापन करावे असे मत अध्यक्षीय समारोपात प्रा.भीमाशंकर शेटे यांनी केले. प्रशिक्षण घेतलेले . युवा विज्ञान प्रसारक हे जानेवारी २०२६ पर्यंत विविध विद्यालयात जाऊन विद्यार्थ्यांना विज्ञान विषयाचे अध्यापन करणार आहेत. संचालन आदित्य कदम तर आभार हेमंत धानोरकर यांनी मानले. दि.०३ ते ०५ जुलै या कालावधीतील विज्ञान शिक्षक,प्रयोग शाळा सहाय्यक यांच्या कार्यशाळेत २९ शिक्षक तर दि.०५ व ०६ जुलै रोजी संपन्न झालेल्या युवा विज्ञान प्रसारक प्रशिक्षण शिबीरात ९० विद्यार्थी उपस्थित होते. या दोन्ही उपक्रमासाठी योगेश्वरी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष चंद्रशेखर बर्दापूरकर,उपाध्यक्ष जी.बी.व्यास,कार्यकारी उपाध्यक्ष ॲड. जगदीश चौसाळकर,सचिव कमलाकर चौसाळकर, कोषाध्यक्ष डॉ.शैलेश वैद्य यांचे मार्गदर्शन लाभले.

# १११ ग्रामपंचायतचे सरपंच पदाचा आरक्षण सोमवारी सोडत

**अंबड । प्रतिनिधी**

**अंबड तालुक्यातील १११ ग्रामपंचायतींच्या सरपंचपदाचे आरक्षण निश्चित करण्यासाठी दिनांक १४/०७/२०२५ रोजी सकाळी ११.०० वाजता तहसीलदार कार्यालय अंबड येथील बैठक सभागृहात सोडत काढण्याची घोषणा करण्यात येणार आहे अशी माहिती अंबडचे तहसीलदार श्री विजय चव्हाण यांनी दिली आहे.**



ग्रामविकास विभाग, महाराष्ट्र राज्य, यांच्या १३ जून २०२५ रोजीच्या अधिसूचनेनुसार, सरपंच आणि उपसरपंच निवडणूक नियम, १९६४ च्या नियम २ अ मधील उपनियम (१) आणि (२) नुसार मिळालेल्या अधिकारांचा वापर करून हे आरक्षण निश्चित केले जाईल. यापूर्वीच्या सर्व अधिसूचना रद्द करून, ०५ मार्च २०२५ रोजी राजपत्रात प्रसिद्ध झालेल्या अधिसूचनेनुसार, अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग आणि महिलांसाठी (अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, नागरिकांचा मागास प्रवर्ग यातील महिलांसह) राज्यभरातील जिल्हावार सरपंचपदाचे आरक्षण वाटप करण्यात आले होते. जालना जिल्ह्यातील एकूण ७७८ ग्रामपंचायतींपैकी १११ ग्रामपंचायतींसाठी ही सोडत काढण्यात येणार आहे.

# कार्यकारी अभियंताच्या हुकुमशाहीमुळे वाहन चालकाचे उपोषण?

**जालना । प्रतिनिधी**

**लघुपाट बंधाराचे कार्यकारी अभियंता यांच्या हुकुमशाहीमुळे वाहन चालक कर्मचाऱ्याला उपोषण करण्याची वेळ कार्यकारी अभियंता व ल.पा. उपविभाग कु. पिंपळगाव या दोन्ही कार्यालयाला न्याय मिळण्यासाठी बऱ्याच दिवसांपूर्वी पत्र देण्यात आले होते सुदरील पत्राचे दखल घेण्यात आली नसून यामुळे उपोषण करण्याचा वेळ आला आहे अशी प्रतिक्रिया उपोषण करते श्री गायकवाड यांनी दिली तसेच यावेळी बोलताना श्री गायकवाड म्हणाले की टक्केवारी दिल्याशिवाय तुमचं काम होणार नाही असे काही संबंधित अधिकारी कर्मचाऱ्याकडून बोलल्या जात आहे. असे श्री शंकर बाबुराव गायकवाड यांनी सांगितले.**

एस. बी. गायकवाड, वाहन चालक यांनी १८/०६/२०२५ मला न्याय मिळण्यासाठी अर्ज दिला होता. सदरील अर्जाची कोणतीच दखल न घेतल्यामुळे मी तीन दिवसापासून उपोषण करीत आहे यावेळी त्यांनी सांगितले. एस.बी. गायकवाड वाहन चालक यांनी आपल्या कार्यालयास सन २०२२-२०२३ व २०२४ ची प्रवास भत्ता व अतिकालीक भत्याची देयके सादर केलेली आहेत. त्यांनी वारंवार मागणी करुन ही शासनाच्या धोरणानुसार 'पहिल्या आलेल्यास प्रथम प्राधान्य'' देवून निकाली काढणे आवश्यक होते. परंतु नियमाप्रमाणे कर्मचारी अधिकाऱ्यांनी



कारवाई केली नाही. याबाबत पाटबंधारे विभागाचे कार्यकारी अभियंता रोहित देशमुख यांना विचारले असता ते म्हणाले की उपोषण करते यांचं काम होणार नाही असे ते म्हणाले परंतु याबाबत काम का होणार नाही विचारले असता त्यांनी बोलताना संपर्क तोडला म्हणून याचा अर्थ काय आहे अशी उलट सुलट चर्चा सुरू आहे. याप्रकरणी अधीक्षक अभियंता छत्रपती संभाजी नगर व जालना जिल्हाधिकारी यांनी चौकशी करावे अशी मागणी होत आहे.

## पान १ वरून...



### तुकडा बंदी

सोप होईल, त्यांना सरकार दरबारी हेलपाटे मारण्याची गरज राहणार नाही असे महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी म्हटले आहे.

---------

### शिवसेना ठाकरे गट अन् मनसेच्या

कार्यकर्त्यांमध्ये चर्चा आहे. या दरम्यान अनेकांनी वेगवेगळे वक्तव्य सुध्दा केले. त्यामुळे आता राज ठाकरे यांनीच अशा नेत्यांच्या तोंडाला कुलूप लागेल, असे विधान केले आहे. मनसे आणि ठाकरे सेनेच्या युती संदर्भात कोणीही बोलू नये, असा आदेश राज ठाकरे यांनी आपल्या नेते आणि पदाधिकाऱ्यांना दिला आहे. पुढे ते म्हणाले, एक स्पष्ट आदेश...पक्षातील कोणीही वर्तमानपत्रं, वृत्तवाहिन्या किंवा कोणत्याही डिजिटल माध्यमांशी संवाद साधायचा नाही. तसेच स्वतःचे प्रतिक्रियांचे व्हिडीओज सोशल मीडियावर टाकायचे हे पण अजिबात करायचे नाही. आणि माध्यमांशी संवाद साधण्याची अधिकृत जबाबदारी ज्या प्रवक्त्यांना दिली आहे त्यांनी देखील मला विचारल्याशिवाय, माझी परवानगी घेतल्याशिवाय कुठल्याही प्रकारच्या माध्यमांशी संवाद साधायचा नाहीये, आणि सोशल मीडियावर व्यक्त व्हायचे नाही, असे राज ठाकरेंनी एक्सवर पोस्ट करुन सांगितले.

--------

### एसबीआयकडून ९६ हजार

यांनी बँकेकडे सर्वसाधारण सभेच्या निमित्ताने काही आकडेवारी मागितली होती. बँकेने वेलणकर यांना ही आकडेवारी दिली आहे. मात्र कोणत्या मोठ्या कंपन्यांनी बँकेची कर्ज बुडवली त्यांची नावे जाहीर करण्यास मात्र बँकेने नकार दिला आहे.

--------------

### भारतीय हवाई दलाचे

पोहोचले. अपघाताचे कारण अद्याप समजू शकलेले नाही. चुरुचे एसपी जय यादव यांनी २ वैमानिकांच्या मृत्यूची पुष्टी केली असून ढिगाऱ्याजवळ वाईटरित्या विद्रूप झालेल्या मृतदेहांचे तुकडे आढळले आहेत.

------------

### शिक्षकांसमोर सरकार

भेटायला पाठवले. शिक्षकांच्या मागण्या मान्य केल्याची घोषणा करताना महाजन म्हणाले की, 'मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि सरकारला तुमची काळजी आहे. आम्हाला माहिती आहे की, आपण सामान्य कुटुंबातील आहात. अतिशय धाडसी निर्णय फडणवीसांनी त्यावेळी घेतला. त्यानुसार, २० टक्के, ४० टक्के त्यानंतर ६० टक्के दिले. मात्र सरकारी तिजोरीवरील आर्थिक संकटामुळे पुढचे टप्पे देण्यास उशीर झाला आहे. तुम्ही याबाबत वारंवार मागणी करत होतात, असेही महाजन म्हणाले.

-----------

### महाराष्ट्रानंतर बिहारमध्येही

घेण्याचा हा एक मार्ग आहे. राहुल म्हणाले की, तुम्हाला जे करायचे आहे ते करा, पण नंतर कायदा तुमच्यावर मात करेल. कायदा तुम्हाला सोडणार नाही. मी तुम्हाला हमी देतो की तुम्ही कितीही मोठे असलात तरी कायदा तुम्हाला सोडणार नाही. तुम्ही तुमचे काम करत नाही आहात. राहुल म्हणाले, काही महिन्यांपूर्वी महाराष्ट्रात लोकसभा निवडणुका झाल्या. त्यानंतर काही महिन्यांनी महाराष्ट्र आणि हरियाणामध्ये विधानसभा निवडणुका झाल्या. इंडिया आघाडीने लोकसभा निवडणुका जिंकल्या. काही महिन्यांनी विधानसभा निवडणुका हरल्या. त्यावेळी आम्ही जास्त काही बोललो नाही. काही काळानंतर, आम्ही डेटा पाहण्यास सुरुवात केली. आम्हाला आढळले की लोकसभा निवडणुकीनंतर विधानसभा निवडणुकीत एक कोटी नवीन मतदार जोडले गेले. म्हणजे विधानसभा निवडणुकीत १० टक्के अधिक मतदारांनी मतदान केले. जेव्हा आम्हाला हे मतदार कुठून आले, ते कोण आहेत हे कळले तेव्हा आश्चर्यकारक गोष्टी समोर आल्या. ज्या जागांवर मतदारांची संख्या वाढली, तिथे भाजप जिंकला. सर्व नवीन मते भाजपला गेली आहेत, असे ते म्हणाले. जेव्हा आम्ही मतदार यादी आणि मतदानाचा व्हिडिओ मागितला तेव्हा निवडणूक आयोग गप्प बसला. एकही शब्द बोलला नाही. एकदा नाही, तर अनेक वेळा. त्यांना सांगितले की कायद्यानुसार आम्हाला मतदार यादी दिली पाहिजे. कायद्यानुसार व्हिडिओग्राफी आम्हाला दिली पाहिजे असे म्हटले आहे. आजपर्यंत महाराष्ट्राची मतदार यादी आम्हाला देण्यात आलेली नाही. व्हिडिओ देण्याचा कायदा बदलण्यात आला आहे.

-------------

### पावसाच्या खंडामुळे झालेल्या

त्यामुळे शेतात पेरणी केलेल्या पिंकाचे संपूर्ण नुकसान झाले आहे. आणि शेतकऱ्यांवर दुबार पेरणी करण्याची वेळ आली आहे. सोबतच सातत्याने विद्युत पुरवठाही शेतकऱ्यांना मिळत नसल्याने शेतीपिकांना दोन्ही बाजूंनी अडचणींचा सामना करावा लागत आहे. त्यामुळे झालेल्या नुकसानींबाबत महसूल आणि कृषी विभागाकडून पीकनिहाय पंचनामे करून शेतकरी बांधवांना अर्थसहाय्य आणि दुबार पेरणीसाठी सहकार्य करावे. अशी मागणी आ.संदीप क्षीरसागर यांनी प्रशासनाकडे केली आहे.

------------

### कागदपत्रे अडवली तर

घेत आहेत, धाराशिव जिल्ह्यातल्या कार या गावात जरांगे पाटील यांची बैठक पार पडली, या बैठकीत बोलताना त्यांनी पुन्हा एकदा आरक्षणाच्या मुद्द्यावरून सरकारला इशारा दिला आहे.

**नेमकं काय म्हणाले जरांगे पाटील?**

आमची कागदपत्रं अडवली तर आम्ही शासकीय कार्यालयाला घेराव घालणार आहोत, मराठ्यांच्या मुलांचं नुकसान होत असेल तर आम्ही गप्प बसणार नाहीत, आमच्या लेकरांचं वाटोळ होत असेल तर आम्हालाही कळतं सरकारला कस नीट करायचं, असं मनोज जरांगे पाटील यांनी म्हटलं आहे. दरम्यान यावेळी बोलताना त्यांनी मंत्री संजय शिरसाट यांच्यावर देखील आरोप केला आहे. कुणबी सर्टिफिकेट देऊ नयेत यासाठी संजय शिरसाट हे अधिकाऱ्यांवर दबाव आणत असल्याचा आरोप जरांगे पाटील यांनी केला आहे.

----------

### शेतकरी कर्जमाफीसाठी

भाजपाचे असतात, कांग्रेसचे असतात, उभाटाचे असतात, दुसऱ्या शिवसेनेचे पण असतात आणि यात्रेच्या. आहे म्हणजे जिथं चारत होते तिथे चारू देत नाही फॉरेस्ट वाले त्या वनमंत्र्याच काहीच ऐकत नाही. खालचे अधिकारी वनमंत्र्यांनी सांगितले. खाली का नाही यांना पाच वर्षाच्या वरते झाड असेल तिथं चारू द्या आणि खालचे अधिकारी म्हणते मंत्री कोण आहे आम्हाला माहित नाही अशी अवस्था या मंत्रालयातल्या मंत्र्यांची झाली आहे. शेतकरी कर्जमाफीसाठी उच्चस्तरीय समिती ते १५ दिवसात जाहीर करणार होते आता २० दिवस झाले तरी काहीच झाले नाही. आता म्हणतात पावसाळी अधिवेशन संपण्यापूर्वी जाहीर करु, दिव्यांगाच मानधन आहे ते अधिवेशनात जाहीर करतो अजूनपर्यंत केले नाही आणि त्याच्यासोबत आमचे १७ प्रश्न आहे ते याच अधिवेशनात मार्गी लावावेत, अशी आमची मागणी आहे. त्यासाठी आम्ही शेतकरी यात्रा काढणार आहोत. या यात्रेत शेतकऱ्यांनी लाठीकाठी, रुमणे हाती घेऊन एकजूट करुन सरकारला हिसका दाखवावा, असे आवाहन बच्चू कडू यांनी केले आहे.

------------

राज्य लोकतंत्र
नवी दिशा... नवे विचार.....
गुरुवार दि. १० जुलै २०२५


# जुगार अड्ड्यावर छापा, ७०,००० रुपयांचा मुद्देमाल जप्त, ७ आरोपी गजाआड

पिंपळनेर । प्रतिनिधी

पिंपळनेर पोलिसांनी आज, दि. ०८.०७.२०२५ रोजी मौजे मैंदा येथे सुरू असलेल्या एका जुगार अड्ड्यावर छापा टाकून ७ जुगारींना अटक केली. त्यांच्याकडून रोख रक्कम आणि तीन मोटारसायकलींसह एकूण सुमारे ७०,०००/- रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. या कारवाईमुळे परिसरात अवैध धंद्यांना चाप बसल्याचे बोलले जात आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, पिंपळनेर पोलीस ठाण्याचे पोउपनि गोलवाल साहेब यांना गुप्त बातमीदारामार्फत मैंदा गावातील अर्जुन अंकुशकर यांच्या घराशेजारील लिंबाच्या झाडाखाली काही इसम तिर्रट नावाचा जुगार खेळत असल्याची खात्रीशीर माहिती मिळाली.या माहितीच्या आधारे, पोउपनि श्री. गोलवाल साहेब यांनी प्रभारी अधिकारी सपोनि श्री. घुगे साहेब यांना कळवून सपोनि मधुसूदन घुगे, पोउपनि अर्जुन गोलवाल, पोशि/८८७ अविनाश सानप, पोशि १२६० दिलीप सोनवणे, पोशि १९४४ वैजिनाथ मगर यांच्या पथकासह दोन पंचांना घेऊन दुपारी ३:४५ वाजता छापा टाकला. पोलिसांनी घटनास्थळी पोहोचताच अर्जुन अंकुशकर यांच्या घराशेजारील लिंबाच्या झाडाखाली मोटारसायकली गोलाकार लावून ७ इसम पत्त्यांवर पैसे लावून तिर्रट जुगार खेळताना आढळून आले. पोलिसांना पाहताच जुगार खेळणारे इसम पळून जाण्याच्या तयारीत असताना, पोलिसांनी त्यांना ताब्यात घेतले. मात्र, एक इसम आपली मोटारसायकल सोडून पोलिसांची नजर चुकवून पळून जाण्यात यशस्वी झाला.

# वडवणी तहसील कार्यालयासमोर लालबावटा संघटनेचे निदर्शने आंदोलन

वडवणी । प्रतिनिधी

**सेंटर ऑफ इंडियन ट्रेड युनियन्स सिटू कामगार संघटना व कामगार कृती समितीच्या वतीने देशभर काम बंदची हाक दिली होती या हाकेला ओ देत वडवणी तालुक्यात सिटु कामगार संघटना व लाल बावटा बांधकाम संघटनेच्या वतीने वडवणी तहसील कार्यालय जोरदार निदर्शने आंदोलन करण्यात आली.**

केंद्र व राज्य सरकारच्या कामगार व शेतकरी शेतमजूर विरोधी धोरणामुळे कामगारांचे अनेक प्रश्न प्रलंबित आहेत.इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाच्या योजनेतील लाभ तात्काळ मिळत नाही,.शालेय पोषण आहार कामगारांना जाहिर केलेले वाढीव मानधन आद्याप मिळालेले नाही,.आशा व गटप्रवर्तक यांना अत्यंत अल्प मानधनात काम करून घेतले जाते,.व त्याच्या भविष्याची कोणत्याही प्रकारची हामी नाही.,कामगार कायदे मोडीत काढून चार ४ कामगार श्रम संहिता लागू करणार असल्यामुळे खाजगी कारखानदारांना कामगारांच्या शोषणाचे संधी मिळाली आहे.त्यामुळे कामगार कृती समितीने देशपातळीवर आज संप पुकारण्यात आलेला आहे. या संपाला पाठिंबा देण्यासाठी आज वडवणी तालुक्यातील कामगार सिटू संघटनेच्या नेतृत्वाखाली एकत्र येऊन वडवणी तहसील कार्यालय जोरदार निदर्शने करण्यात आली या वेळी कॉ.ओम पुरी यांनी कामगारांना निवेदन वाचुन दाखवले हे निदर्शने का करण्यात येत आहेत याची संपूर्ण माहिती दिली व या धरणे आंदोलनाला कॉ.दत्ता डाके यांनी मार्गदर्शन केले. व



खालील मागण्याला घेऊन निदर्शने करण्यात आली कामगार विरोधी मालकधार्जण्या ४ चार श्रमसंहीता रद्द करा., बांधकाम कामगारांच्या योजनाला सेवा हमी कायदा लागू करा.म्हणजे बांधकाम कामगारांना योजनेचा लाभ तीन महिन्यांच्या आत मिळेल.,सार्वजनिक उद्योगांचे खाजगीकरण थांबवा, बांधकाम कामगारांसाठी जाहिर केलेले ५००० रू दिवाळी बोनस तात्काळ द्यावे, कामगार व शेतकऱ्यांना राशन कार्ड द्यावे,राशन कार्ड वरील नावे लवकर दुरुस्त करून द्यावी, गेल्या शैक्षणिक वर्षात कामगारांना पाल्यांची शिष्यवृत्तीचे पैसे तात्काळ द्या ,बांधकाम कामगारांच्या योजनाला सेवा हमी कायदा लागू करा म्हणजे बांधकाम कामगारांना योजनेचा लाभ तीन महिन्यांच्या आत मिळेल., बांधकाम कामगारांसाठी पुर्वी सारखी साहित्य खरेदी योजना सुरू करा .,,बांधकाम कामगारांना भांडी नको पैसे द्या.,शेतकऱ्यांना संपूर्ण कर्जमाफी द्या.,शेतकऱ्यांचा माल हमीभावाने खरेदी करा., जनतेच्या लोकशाही अधिकारांवर गदा आणणारे महाराष्ट्र जन सुरक्षा विधेयक मागे घ्या,.आशा व गटप्रवर्तकाचे सहा महिन्यांचे थकीत मानधन द्या.,शालेय पोषण आहार कामगारांच्या मानधनात केलेली एक १००० रु वाढ तात्काळ द्या., कामगारांना किमान वेतन २६००० रू द्या , निर्धारांना वेळेवर पेन्शनचे पैसे द्या., घरकुल लाभार्थींच्या खात्यावर घरकुलर हाफत्याचे पैसे तात्काळ द्या., शेतकऱ्यांना तात्काळ पिक कर्ज द्या,गायरानात व इतर जागेत बांधलेली घरे व वीस वर्षे पासून कसत असलेली गायरान जमिन शेतमजूराच्या नावे करा.,घरकुल योजनेचे अनुदान साडेचार लाख करा .,ऊसतोड मजुरांच्या मुलाना ऊसतोड कामगार महामंडळाकडू शिष्यवृत्ती योजना सुरू करा वरील सर्व मागण्याचा घेऊन जोरदार घोषणाबाजी करण्यात आली व तहसील परिसर घोषणाणी दनदनून निघाला .मा.तहसिलदार साहेब यांनी आंदोलकाजवळ येऊन निवेदन स्वीकारले व सकारात्मक चर्चा करून या मागण्या शासनास पाठवून व स्थानिकच्या मागण्यावर तात्काळ कार्यवाही करण्याचे आदेश दिले. हे आंदोलन यशस्वी करण्यासाठी,कॉ.पप्पू आजबे,कॉ.भागवत झाटे, कॉ.अन्सर शेख , साथी.जावेद शेख , विलास पवार,हारिदास गिरी , भारत साळुंके, नितीन भैरट ,ज्ञानेश्वर चोरघडे, सिद्धेश्वर शिंदे,उमेश काळे , डिंगाबर डुक्करे ,गोरख चांभारे, इ कामगारांनी परीश्रम घेतले व बांधकाम कामगार व इतर कामगारांची उपस्थित मोठ्या संख्येने होती.

# विवेक सुरवसे यांची शास्त्रज्ञ म्हणून झाली निवड

कळंब । प्रतिनिधी

कळंब तालुक्यातील शेलगाव (दि.) येथे प्राथमिक शिक्षक म्हणून कार्यरत असणारे ज्ञानेश्वर गोपीनाथ सुरवसे यांचा मुलगा विवेक याची भारत सरकारच्या न्यूक्लियर पावर कॉर्पोरेशन ऑफ इंडिया लिमिटेड या ठिकाणी शास्त्रज्ञ म्हणून निवड झाली असून त्याचा नियुक्ती आदेश नुकताच प्राप्त झाला आहे. त्याच्या या कामगिरीचे सर्वत्र कौतुक करण्यात येत आहे. विवेक चे प्राथमिक शिक्षण जिल्हा परिषद शाळेत झाले आहे. तर माध्यमिक शिक्षण जनता विद्यालय मुरुड येथे झाले आहे. सुरवाती पासूनच अभ्यासात कायम अग्रस्थानी असणाऱ्या विवेकने दहावीत शंभर टक्के गुण घेऊन आपली भविष्यातील दिशा दाखवून दिली होती. आणि तेव्हा पासूनच शास्त्रज्ञ होण्याचे त्याचे स्वप्न होते. लातूर येथील नामांकित राजर्षी शाहू महाविद्यालयातून आयआयटी जेईई तयारी करून भारतातील अव्वल असणाऱ्या आयआयटी मद्रास (चेन्नई) तामिळनाडू येथून इलेक्ट्रीकल इंजिनिअरिंग मधून प्रथम श्रेणीत पुर्ण केले. परीक्षा २०२५ यशस्वी होवून या द्वारे वैज्ञानिक क्षेत्रात पदार्पण केले. विवेकने लहाणपणापासून बाळगलेल स्वप्न साकार होत



असताना या पर्यंतच्या प्रवासात वडिलांबरोबर आईचे कष्ट अधिक मोलाचे ठरले आहे. त्यामुळे विवेकचे वडील विवेकच्या यशाचे श्रेय त्याच्या आईला व मार्गदर्शक सर्व शिक्षक यांना देतात. विवेकच्या या यशाबद्दल सर्व संबंधित शिक्षक, तसेच नेहमी मार्गदर्शन करणारे धर्मराज काळमाते, गटशिक्षणाधिकारी कळंब, व विविध अधिकारी आणि सर्व स्तरातून कौतुक होत आहे. सामान्य शिक्षकाच्या मुलाने मिळवलेले यश आदर्शवत असून त्याबद्दल विवेक बरोबर त्याच्या आई वडिलाचे देखिल सर्वत्र अभिनंदन आणि कौतुक होत आहे. त्याच्या या यशाबद्दल कळंब एम .एस. ई. बी चे सहाय्यक लेखापाल भारत निगुळे साहेब ,डॉ अशोक शिंपले, पत्रकार प्रदिप यादव, देशपांडे सर- जनता विद्यामंदिर मुरुड ,श्रीकांत सर - शाहू महाविद्यालय ,शंकर सर शाहू महाविद्यालय ,सगर सर मुरुड ,प्रा.सतीश पवार सर सी ई . टी सेल , कैलास बिडवे सर, जिरंगे मॅडम, रामकृष्ण देशपांडे, कोडारे मॅडम , रवि शिनगारे मुख्याध्यापक , संतोष माळी विस्तार अधिकारी, श्रीकांत मोपल्ला , प्रा.शंकर सर या सर्वांनी अभिनंदन करून पुढील कार्यास शुभेच्छा दिल्या आहेत.

# गेवराई तहसील कार्यालयातील जन्म प्रमाणपत्र घोटाळा प्रकरणी सखोल चौकशी करण्याची वंचितची मागणी

## आर.डी.सी. शिवकुमार स्वामी यांची कार्यपद्धती अन्यायकारक-अजय सरवदे

बीड । प्रतिनिधी

गेवराई तालुक्यातील तहसील कार्यालयाच्या अधिपत्याखालील जन्म प्रमाणपत्र नोंदणी प्रक्रियेत गंभीर गैरव्यवहार झाल्याचे उघडकीस आले आहे. या प्रकरणात महसूल सहायक अतुल केदार यांना अपूर्ण कागदपत्रांच्या आरोपाखाली निलंबित करण्यात आले असून, या कारवाईच्या पार्श्वभूमीवर गंभीर लाचखोरीचे आरोप समोर आले आहेत.

प्रकरणात तहसीलदार खोमणे, तसेच नायब तहसीलदार कट्टे व सोनवणे यांचाही सहभाग असूनही, त्यांच्यावर कोणतीही निलंबनात्मक कारवाई करण्यात आलेली नाही. निवासी उपजिल्हाधिकारी श्री. शिवकुमार स्वामी यांनी याबाबत कोणतीही कार्यवाही न करता, केवळ अतुल केदार यांच्यावरच निलंबनाची कारवाई केल्याने तीव्र संताप व्यक्त केला जात आहे. विश्वसनीय सूत्रांनुसार, नायब तहसीलदार कट्टे व सोनवणे यांनी दलालामार्फत उपजिल्हाधिकारी श्री. शिवकुमार स्वामी यांना प्रत्येकी २ लाख रुपये लाच दिल्याचा गंभीर आरोप करण्यात आला आहे. त्यामुळे त्यांच्यावर कुठल्याही प्रकारची शिस्तभंगाची कारवाई करण्यात आली नाही. याच प्रकरणात महसूल सहायक अतुल केदार यांना देखील दलालामार्फत ''१ लाख रुपये दिल्यास निलंबन टाळता येईल'' असा संदेश देण्यात आल्याचे समजते. मात्र, त्यांनी पैसे देण्यास नकार दिल्यामुळे एकतर्फी निलंबनाची कारवाई करण्यात आली. ही बाब संपूर्ण यंत्रणेच्या पारदर्शकतेवर प्रश्नचिन्ह निर्माण करणारी आहे.

या प्रकरणावरून निवासी उपजिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी यांनी आपल्या पदाचा दुरुपयोग करून निवडक कारवाई केल्याचे स्पष्ट दिसते. त्यामुळे त्यांच्या कार्यपद्धतीवरही संशय व्यक्त होत आहे.

या सर्व प्रकरणाची सखोल चौकशी करून, दोषी ठरलेल्या पुढील अधिकाऱ्यांवर कायदेशीर कारवाई करण्याची मागणी वंचित बहुजन आघाडीचे जिल्हाध्यक्ष अजय सरवदे यांनी केली आहे. निवासी उपजिल्हाधिकारी श्री. शिवकुमार स्वामी, तहसीलदार श्री. खोमणे, नायब तहसीलदार श्री. कट्टे, नायब तहसीलदार श्री. सोनवणे, संबंधित दलाल/मध्यस्थ यांच्यावर प्रकरणी लाचलुचपत प्रतिबंधक कायदा १९८८ (संशोधित) अंतर्गत गुन्हा नोंदवून, दोषींना तत्काळ अटक व निलंबन करण्याची मागणी केली आहे.

# विनायक माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाचे नवे प्राचार्य बेग



बीड । प्रतिनिधी

विनायक माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाने . एच. एम. बेग सर यांची मुख्याध्यापक / प्राचार्य म्हणून आणि आर. एस. अनुसे सर यांची उपमुख्याध्यापक म्हणून निवड केली.

या निवडीबद्दल क्रांतिकारी शिक्षक संघटनेचे सचिव शाहीद कादरी सर,. असरार खान सर आणि प्रा. डॉ. शशिकांत गायकवाड सर यांनी त्यांचे मनःपूर्वक अभिनंदन केले आणि शुभेच्छा दिल्या.

कार्यक्रमात ज्यू कॉलेजचे पर्यवेक्षक राजेंद्र गाडेकर सर, अमरापुरकर सर, नरवडे सर, रणजीत पिंगळे सर, आणि शेळके सर यांनी सहभाग घेतला. एस. एस. उनबेग यांनी कार्यक्रमाची प्रस्तावना सादर केली. विद्यालयातील सर्व शिक्षक बांधव या कार्यक्रमाला उपस्थित राहून आपले पाठबळ दिले.

# धानोरा खु. येथे महिलांची सोयाबीन व ऊस शेतीशाळा

अंबाजोगाई प्रतिनिधी

सुधारित कृषी तंत्रज्ञानाच्या प्रसारासाठी शेतीशाळा हे प्रभावी माध्यम असल्याने तसेच शेती व्यवसायामध्ये महिलांचा मोलाचा वाटा असल्याने कृषी विभागाने महिलांच्या शेतीशाळा घेण्यावर विशेष भर दिलेला आहे. कृषी विषयक नवीन तंत्रज्ञानाची माहिती महिला शेतकऱ्यांपर्यंत पोहोचवण्यासाठी नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्प आणि नॅचरल शुगर रांजणी यांच्या संयुक्त विद्यमाने कृषिरत्न बी. बी ठोंबरे, उपविभागीय कृषी अधिकारी गायकवाड यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक कृषी अधिकारी पंडित काकडे व ऊस विकास अधिकारी शिवप्रसाद येळकर यांनी धानोरा खुर्द येथे



महिलांची शेतीशाळा घेऊन मार्गदर्शन केले. काकडे यांनी सोयाबीन पिकामधील रसशोषक कीड पांढरी माशी, खोडमाशी प्रादुर्भावाची निरीक्षणे दाखवून व्यवस्थापनासाठी चिकट सापळे यांचा वापर बाबत विस्तृतपणे माहिती दिली तसेच सरी वरंब्यावर टोकन पद्धतीने सोयाबीन लागवड केल्यामुळे बियाण्याची झालेली बचत बाबत चर्चा केली. सिडिओ शिवप्रसाद येळकर यांनी कमी खर्चातील चिकटसापळे तयार करणे, अळीवर्गीय किडींचा जीवनक्रम सांगून व्यवस्थापनासाठी कामगंध सापळ्यांचे महत्त्व विस्तृतपणे माहिती देऊन कामगंध सापळे लावण्याचे प्रात्यक्षिक प्रशिक्षण करून दाखवले. चुनखडी युक्त शेत जमिनीमधील ऊस पिकामधील पिवळसरपणा विकृती व्यवस्थापन महाराष्ट्र ग्रेड २ मल्टीमायक्रोन्यूट्रिएंटची ३ मिली प्रति १ लिटर पाणी याप्रमाणे फवारणी करणे, ऊस पिकामधील पोक्का बाईंग रोग व्यवस्थापनासाठी प्रोपिकोनाझोल २५ टक्के ईसी १ मिली प्रति १ लिटर पाणी याप्रमाणे फवारणी करावी, जमिनीमधील घातक बुरशींच्या व्यवस्थापनासाठी नॅचरल शुगर उत्पादित फर्मेंटेड ऑरगॅनिक मॅन्युअर (एफओएम) मध्ये ट्रायकोडर्मा मिसळून वापर बाबत विस्तृतपणे माहिती दिली तसेच नॅचरल शुगरच्या माध्यमातून ड्रोनच्या साह्याने अनुदानित फवारणी, नॅचरल ऑरगॅनिक फर्टीलायझर उपलब्धता बाबत माहिती दिली. ग्राम महसूल अधिकारी सुहास चाटे यांनी ॲग्रीस्टॅक बाबत मार्गदर्शन केले. यावेळी तालुका कृषी अधिकारी मुंडे, सरपंच पार्वती पोळ, बेस्ट ॲग्रोचे प्रतिनिधी उबाळे, तुकाराम रेड्डी आणि महिला व पुरुष शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# प्रयास फाउंडेशनच्या वतीने नागपूरच्या शाळेत शैक्षणिक साहित्याचे वाटप



बीड । प्रतिनिधी

बीड तालुक्यातील नागापूर बुद्रुक जि. प. प्राथमीक शाळा येथे प्रयास फाउंडेशन च्या वतीने विकलांग विद्यार्थ्यांसह इतर विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात आले. यावेळी मुख्याध्यापक युवराज साळुंके यांनी उपस्थितांचे स्वागत केले.

नवीन शैक्षणिक वर्ष सुरू झाल्यानंतर गुरु आनंद प्रतिष्ठान आयोजित प्रयास फाउंडेशन मुंबई यांच्या वतीने बीड तालुक्यातील नागापूर बुद्रुक या शाळेत विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात आले. गुरु आनंद प्रतिष्ठानच्या सीमा ओस्तवाल यांच्या सहकार्याने सलग दोन वर्ष या शाळेत शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात आले आहे. या साहित्य वाटपाबद्दल शाळेच्या शैक्षणिक समितीचे अध्यक्ष बाळू कंधारे व मुख्याध्यापक युवराज साळुंके यांनी सौ. सीमा ओस्तवाल यांचे आभार मानले. यावेळी सामाजिक कार्यकर्ते राहुल टेकाळे म्हणाले की जिल्हा परिषदेच्या मराठी शाळा मधूनही आता अत्याधुनिक तंत्रज्ञानासह दर्जेदार शिक्षण दिले जात आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांनी या शाळेतच प्रवेश घ्यावा व आपले शिक्षण पूर्ण करावे असे आवाहन त्यांनी यावेळी केले. याप्रसंगी सरपंच किशोर ढोकणे, ग्रामपंचायत सदस्य महादेव परसकर, सचिन शिंदे यांच्यासह पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते. नागापूरच्या शाळेतच नव्हे तर बीड तालुक्यातील बहुतांश शाळेमध्ये सौ. सीमाओस्तवाल यांनी शैक्षणिक साहित्याचे वाटप केले केले असल्याने पालकांनी त्यांचे कौतुक केले. या कार्यक्रमाचे आभार शेवटी शाळेच्या शिक्षिका सविता राऊत यांनी मानले.

# सोन्नाखोटा ते रूई रस्त्यावर काम सुरू असणाऱ्या पुलाच्या खड्ड्यात ट्रक पलटी

वडवणी । प्रतिनिधी

**वडवणी तालुक्यातील सोन्नाखोटा ते रुई या रस्त्यावर सुरू असणाऱ्या पुलाच्या कामाच्या वेळी तेथून पर्याय काढून दिलेल्या रस्त्यावरून जात असणारा खताचा ट्रक पुलाच्या बांधकामावर पलटला आहे यामध्ये सुदैवाने कसली जीवितहानी झाली नाही.**

वडवणी तालुक्यात नवीन रस्त्याचे व पुलाचे कामे हे मोठ्या प्रमाणावर सुरू असून यामध्ये सध्या पावसाळ्याचे दिवस सुरू असल्यामुळे काम करण्यास अडचण निर्माण होत आहे यामध्ये तालुक्यातील सोन्नाखोटा ते रूई या रस्त्याचे व पुलाचे काम सुरू असून हे काम नियमानुसार होत नसल्याची तक्रार युवा सरपंच मयूर आंधळे यांनी कार्यकारी अभियंता



पंतप्रधान ग्राम सडक योजना यांच्याकडे लेखी तक्रारीद्वारे केली होती यावरून या ठिकाणी सदरील काम पाहणी करण्यासाठी कार्यकारी अभियंता व काही ग्रामस्थ हे पहाणी करत असताना या ठिकाणाहून पुलाच्या बाजूने काढून दिलेल्या पर्यायी रस्त्याने एक ट्रक जात असताना सदरील चिखलामध्ये खचल्याने ट्रक पलटी झाला यामध्ये या ठिकाणी असणारे अधिकारी व ग्रामस्थ हे तेथून पळून गेले त्यामुळे बाल बाल बचावले आहेत तरी यामध्ये कसलेही प्रकारची जीवित हानी झालेली नाही परंतु रस्त्याचे पुलाचे काम करत असताना दळणवळणासाठी पर्यायी चांगला रस्ता करून देण्याची जबाबदारी संबंधित विभाग व एजन्सी याची आहे.

वडवणी तालुक्यातील सोन्नाखोटा ते रूई या सिमेट रस्त्याचे व पुलाचे पंतप्रधान ग्रामसडक योजनेअंतर्गत काम सुरू असून त्यासाठी दहा कोटी रुपये निधी मंजूर करण्यात आलेला आहे सदरील काम हे एक एजन्सीला मिळालेले आहे सदरील काम हे नियमानुसार होत नसुन निकृष्ट दर्जाचे सुरू असल्याची तक्रार रूई गावचे युवा सरपंच मयूर भैया आंधळे यांनी कार्यकारी अभियंता यांच्याकडे केलेली होती तरी त्यांनी केलेल्या तक्रारीवरून कार्यकारी अभियंता हे काल बुधवार रोजी सदरील सुरू असणाऱ्या पुलाच्या कामाची पाहणी करण्यासाठी आलेले होते तरी सदरील कोट्यावधी रुपयाचे काम हे चांगल्या दर्जाचे करण्याची मागणी करण्यात आलेली आहे.

पान ६ वरून...

## स्पर्धकामुळे उर्जा निर्माण

उपयोगी पडत नसल्याचे लक्षात आल्याने, ही नोकरी सोडून युपीएससीची परीक्षा दिली. दहावीतील अनुभव लक्षात ठेऊन अभ्यास केला. त्यामुळे यात यश प्राप्त झाले आणि आय ए एस झालो. देशाची सेवा करण्यात यश प्राप्त केल्याचे कॉंवत यांनी सांगीतले. त्यांनी निंदकाऐवजी शुभचिंतक हा शब्द वापरला.

मानवतेचा उपक्रम - देशमुख

दानामुळे एखाद्याचे आयुष्य उज्वल होते. आधार माणुसकीच्या उपक्रमातून मुलांच्या शिक्षणास मदत होत आहे. यातून मानवता जपली जात असल्याचे प्रतिपादन ज्येष्ठ व्याख्याते इंद्रजित देशमुख यांनी केले. मुलांनी मोबाईलपासून दूर राहिले पाहिजे, कारण यातून फायद्यापेक्षा तोटे जास्त आहेत. त्यामुळे या मोबाईल राक्षसाचा बंदोबस्त कसा करायचा ते प्रत्येकाने ठरवले पाहिजे, जी माता (आई) आयुष्यभर आपल्यासाठी स्वप्न बघते, तिची काळजीही आपण घेतली पाहिजे असे आवाहनही त्यांनी मुलांना केले. यावेळी नितिका विलाश व अरुण करमरकर यांनीही उपस्थित मुलांना व महिलांना मार्गदर्शन केले. आधार माणुसकीच्या उपक्रमांतर्गत शेतकरी आत्महत्याग्रस्त कुटूंब, एचायव्ही बाधीत व कोरोनाग्रस्त कुटूंबातील ८०० विद्यार्थ्यांना वर्षभर पुरेल एवढ्या शैक्षणिक साहित्याची स्कुलकिट देण्यात आली. ही किट मिळाल्यानंतर मुलांच्या चेहऱ्यावरील आनंद व्दिगुणीत झाला होता.प्रास्ताविक आधार माणुसकीच्या उपक्रमाचे प्रमुख ॲड. संतोष पवार यांनी केले. सूत्रसंचालन शिवानंद गुळवे यांनी केले. पत्रकार प्रशांत बर्दापूरकर यांनी आभार मानले. यावेळी वैद्यकीय, अभियांत्रिकी व इतर शिक्षण घेत असलेल्या गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार वू गौरव मान्यवरांच्या हस्ते झाला. सर्व महिलांना साडी चोळीची भेट सन्माने देण्यात आली. यासाठी कार्यक्रमासाठी उपक्रमाचे सदस्य धनराज पवार, संजय सुरवसे, विकास शिंदे, अनंत निकते, चंद्रशेखर शिंदे, सुधाकर शिंदे, बन्सी आपेट, ग्रामीण विकास मंडळातील महिला, दत्तपूर, श्रीपतरायवाडी येथील महिला बचत गटांनी पुढाकार घेतला.

## जात-धर्म नको,शेजारी

त्या संदर्भातही प्रशासनाच्या भूमिकेबद्दल महत्वपूर्ण तहसीलदार घोळवे यांनी मार्गदर्शन केले. सातबारा वरील शेतकऱ्यांची नावे, दस्तऐवजावरील नावे, आधार कार्ड वरील नावे, यामध्ये अनेक वेळा फरक जाणून येतो. यातील २०% त्रुटी प्रशासनाला दूर करण्याचे अधिकार असून तेही शेतकऱ्यांनी वेळीच दुरुस्ती करून घेतली पाहिजे अशा एक ना अनेक मुद्द्यावरून तहसीलदार सुरेश घोळवे यांनी उपस्थित शेतकऱ्यांना धार्मिक पुराणातील उदाहरण देऊन अभ्यासपूर्ण लेखाजोखा मांडला. शेतकऱ्यांनी आपल्या शेतीमध्ये प्रगती घडवून आणायचे असेल तर जात -धर्म याचा विचार न करता आपला शेजारी शेतकरी आहे म्हणून त्याच्याशी मैत्री केली पाहिजे आणि शेतामध्ये प्रगती साधली पाहिजे असेही यावेळी तहसीलदार घोळवे यांनी सांगितले. या कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे म्हणून जि.प.सदस्य रामराव खेडकर, महाराष्ट्र पोलीस पाटील असोसिएशनचे राज्य अध्यक्ष महादेव नागरगोजे, माजी सभापती रवींद्र जरांगे, तिंतरवणीचे सरपंच उद्धव (बापू )खेडकर, मंडळ अधिकारी निशांत ठाकूर, उद्योजक पिंटूभाऊ खेडकर, माजी सरपंच डॉ. उद्धव खेडकर प्राचार्य रमेश सानप, ज्येष्ठ नागरिक सदाशिव खेडकर, मच्छिंद्र शेळके त्याचबरोबर महसूल विभागाचे तलाठी राहुल गोरडे, कृष्णा कोयते, आकाश भुसारी, पत्रकार दिगंबर गायकवाड, गोरक्ष खेडकर आदींची उपस्थिती होती.

## डॉक्टर्स सुपर मेलोडियस व्हाईस

मंत्रमुग्ध करीत स्पर्धेचे प्रथम पारितोषिक पटकावले. या यशाबद्दल बोलताना डॉ.राजेश इंगोले यांनी तालमार्तंड प्रकाश बोरगावकर, स्वरमंडलचे प्रा.राजकुमार ठोके, प्रसिद्ध गायक सुभाष शेप, प्रसिद्ध गायक बळीराम उपाडे, संगीत शिक्षक अशोक खंदारे, श्रीरंग सुरवसे यांच्या मार्गदर्शनामुळे मला हे यश मिळाले असल्याचे त्यांनी नमूद केले. तर अंबाजोगाईतील मित्र-परिवाराने आणि शुभचिंतकांनी माझ्या गीत गायनाला नेहमीच प्रेरणा दिली, आणि माझा उत्साह वाढवला. त्यामुळे गीतगायन माझा छंद झाला. अनेक ज्ञात अज्ञात लोकांनी सोशल मीडियाद्वारे, फेसबुक द्वारे माझ्या गाण्यांना हजारोच्या संख्येने लाईक केले, पाहिले. त्यामुळे माझा उत्साह दिवसेंदिवस वाढत गेला. त्यामुळे अनेक राज्यस्तरीय स्पर्धांमध्ये मला गायन या क्षेत्रात विविध पुरस्कार मिळाले. आजचा हा राष्ट्रीय पुरस्कार मी माझ्या तमाम मित्र परिवाराला आणि माझ्या शुभेच्छूक मंडळींना अर्पित करतो असे भावोद्गार डॉ.राजेश इंगोले यांनी यावेळी केले.

## रोडागिरी बाबांचा

रोडागिरी बाबा होते. त्यांचे बंधू कड्याचे मौलाली बाबा धामणगावचे सय्यद बादशाह बाबा हि देवस्थानेही आष्टी तालुक्यात प्रसिद्ध आहे. या ठिकाणी पुरातन दर्गाह हि वास्तुशिल्पाचा उत्कृष्ट नमुना पाहायला मिळते. यात्रेत सर्व भाविकांनी शांततेत सहभागी होऊन दर्शनाचा लाभ घ्यावा, असे आवाहन हिवरा - भोजेवाडी ,दादेगाव, डोंगरगणचे सरपंच मंडळी यांनी केले आहे.

--------------

तालुका दंडाधिकारी तथा तहसिलदार यांचे कार्यालय अंबड
दुरध्वनी क्रमांक:०२४८३२७५०२६
E-Mail ID:-tahsildarambad@gmail.com
जा..क्र.२०२५/ सेतु/कावि-७४ दिनांक-२७/०६/२०२५

## जाहीर प्रगटन

तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी, अंबड यांचे न्यायालय

अर्जदार श्रीमान/श्रीमती प्रियंका बाजीराव वाघमोडे रा. महाकाळा ता. अंबड जि. जालना यांनी यांच्या स्वतः च्या जन्म / मृत्यू नोंदीबाबतचा आदेश मिळणेकामी या कार्यालयात विनंती अर्ज सादर केला आहे. तसेच संबधित निबंधकाने त्यांच्या जन्म / मृत्यू नोंदीच्या अनुषंगाने अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्राय या कार्यालयास सादर केला आहे त्याची जन्म / मृत्यूची तारीख खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | नाव | अर्जदाराशी नाते | जन्म / मृत्यू दिनांक |
|---|---|---|---|
| | प्रियंका बाजीराव वाघमोडे | स्वतः | १७/०७/२००४ |

निबंधकानी दिलेल्या जन्म / मृत्यू नोंदीच्या अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्रायनुसार सदर जाहिर प्रगटन प्रसिध्द करण्यात यावे.

तसेच या जाहिर प्रगटनाव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, उक्त नमुद अर्जदार यांच्या जन्म / मृत्यू नोंदीबाबत काही आक्षेप असेल तर यांनी जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन १५ दिवसाच्या आत या कार्यालयास लेखी आक्षेप सादर करावा. सदर कालावधीमध्ये या कार्यालयाकडे आक्षेप प्राप्त झाला नाही. तर संबधित प्रकरणात नियमानुसार उचित कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी

आज दिनांक- २७/०६/२०२५ रोजी माझ्या सहीने व या कार्यालयाच्या शिक्यानिशी जाहिर प्रगटन दिले आहे.

**स्वाक्षरीत**
**तहसिलदार तथा**
**कार्यकारी दंडाधिकारी, अंबड**

# विदर्भातील शेतकऱ्यांना मोठा दिलासा

## अखेर काटोलचा संत्रा प्रक्रिया कारखान्याचा मार्ग मोकळा






नागपूर : विदर्भातील संत्र उत्पादक शेतकऱ्यांना मोठा दिलासा देणारी बातमी समोर आली आहे. ज्या पध्दतीने दर निवडणुकीच्या वेळी अयोध्या येथील राम मंदीराचा मुद्दा होता, त्याच धर्तीवर काटोल येथील संत्रा प्रक्रिया केंद्र हा मुद्दा देखील प्रत्येक निवडणुकीत अग्रस्थानी असायचा. या गंभीर बाबीकडे राष्ट्रवादी काँग्रेसचे नेता आणि जिल्हा परिषद सदस्य सलील देशमुख यांनी सातत्याने पाठपुरावा करीत न्यायालयात प्रलंबीत असलेली केस सुरु केली. अखेर काल (दिनांक ०१/०७/२०२५) रोजी मंगळवारला याचा निकाल लागला असून हा संत्रा प्रक्रिया कारखाना परत एमएआयडीसीला हस्तांतरीत करण्याचा निर्णय उच्च न्यायालयाच्या मुंबई खंडपिठाने दिला आहे. आता एमएआयडीसीच्या माध्यमातुन या प्रकल्पाचा विकास करण्यासाठी प्रयत्न करणार असल्याचे मत सलील देशमुख यांनी व्यक्त केले.

१५ वर्षाच्या न्यायालयीन लढ्याला यश

काटोल येथील संत्रा प्रक्रिया कारखाना हा नेहमीच वादाचा मुद्दा राहीला आहे. हा प्रकल्प सुरु होण्याच्या दुष्टीकोणातुन अनेक दिवसांपासून प्रयत्न सुरु होते. या भागाचे आमदार असतांना अनिल देशमुख यांनी सुध्दा त्यांचे प्रयत्न सुरुच ठेवले होते. परंतु दरम्यानच्या काळात राज्यात भाजपचे सरकार आले आणि अनिल देशमुख यांचा सुध्दा पराजय झाला होता. याच काळात हा प्रकल्प सुरु करण्याचे भाजपच्या अनेक नेत्यांनी निवडणुकीत आश्वासन सुध्दा दिले होते किंबहुना याच मुद्दयावर त्यावेळीची निवडणुक गाजली होती. परंतु राज्यासह देशात पाच वर्ष भाजपाची सरकार राहुन सुध्दा या प्रकल्पाचे संदर्भात एक इंच सुध्दा काम झाले नाही. ज्या मुद्दयावर भाजपाच्या नेत्यांनी निवडणुकीत आश्वासन दिले होते, त्याचा विसर तर त्यांना पडलाच परंतु २०१९च्या निवडणुकीत सुध्दा त्यांनी हा मुद्दा समोर आणला होता. हा प्रकल्प सुरु व्हावा, ही इच्छा अनिल देशमुख व सलील देशमुख यांची होती.दरम्यान, २०१९ ला निवडणुक जिंकताच अनिल देशमुख यांनी परत न्यायालयात असलेल्या या प्रकल्पाचा संदर्भातील संपुर्ण आढावा घेतला. एमएआयडीसीने त्यांचा हा प्रकल्प चालविण्यासाठी नांदेडच्या सांयटेक्निक इ.प्रा.लि. कंपनीला दिला होता. संत्रावर प्रक्रिया होऊन काटोल व नरखेड तालुक्यासह विदर्भातील संत्रा उत्पादकांना याचा फायदा व्हावा, या दुष्टीकोणातुन संबधीत कंपनी कोणतेही काम करीत नव्हती. हाच मुद्दा घेवून मी न्यायालयीन लढाई सुरु केली आणि त्यात यश आले आहे. अशी प्रतिक्रिया सलिल देशमुख यांनी दिली. दरम्यानच्या काळात त्यांच्यावर ईडीची कारवाई झाली. असे असतांनाही सलील देशमुख यांनी अनिल देशमुख यांनी सुरु केलेली लढाई पुढे सुरुच ठेवली. अनेक वेळा एमएआयडीच्या कृषी उद्योग भवन मुंबई येथे कार्यालयातील वरीष्ठ अधिकाऱ्यांसोबत अनेक बैठकी घेतल्या. उच्च न्यायालयाच्या मुंबई खंडपिठात या प्रकरणाच्या जवळपास ४४ तारखा झाल्यात या सर्व तारखांवर मी स्वत: उपस्थित होतो. अशी माहीतीही सलिल देशमुख यांनी दिली.

**प्रकल्प ४ आठवड्यात हस्तांतरीत करण्याचा निर्णय :** न्यायालयात ही लढाई लढण्यासाठी काटोल नरखेड तालुक्यातील संपूर्ण शेतकऱ्यांच्या वतीने वरीष्ठ वकील महेश शुक्ला यांची नियुक्ती करण्यात आली. त्यांनी न्यायालयात योग्य ती बाजू मांडत हा प्रकल्प सांयटेक्निक इ.प्रा.लि.कंपनी चालवित नसल्याने तो एमएआयडीसीला हस्तांतरीत करावी, असा युक्तीवाद केला. न्यायालयाने दोन्ही बाजु ऐकून घेतल्यानंतर उच्च न्यायालयाच्या न्यायमूर्ती शर्मिला देशमुख यांनी हा प्रकल्प आता एमएआयडीसीला सिल खोलुन ४ आठवड्यात हस्तांतरीत करण्याचा निर्णय दिला. या निर्णयाचे स्वागत करीत सलील देशमुख यांनी लवकरच हा प्रकल्प सुरु होण्याच्या दुष्टीकोणतुन प्रयत्न करण्यात येतील असे सांगीतले.

## पावसाळ्यात शेळ्यांच्या शेडची काळजी



पावसाळ्यातील शेळी निवारा व्यवस्थापन महत्वाचे आहे. शेळयांना पावसापासून वाचवण्यासाठी आणि त्यांना कोरडे, हवेशीर आणि सुरक्षित वातावरण मिळावे यासाठी निवारा व्यवस्थित बांधणे आवश्यक आहे.

शेळी गोठा व्यवस्थापन : पावसाळ्यामध्ये पश्चिमेकडून पाऊस व वारा वाहतो. त्यानुसार शेळ्यांचे पावसापासून संरक्षण होण्यासाठी गोठ्यात आवश्यक ती उपाययोजना करावी.

शेळयांना ठेवण्यासाठी वेगवेगळी दालने असावीत, ज्यामुळे आजारी शेळ्या, पिले, गाभण शेळ्या व बोकड वेगवेगळे ठेवता येतील.

शेळ्यांना आवश्यक तेवढी जागा द्यावी. जेणेकरून गर्दी होणार नाही. पावसाळ्यात शेळ्यांच्या शेडच्या प्रवेशद्वाराजवळ चुना टाकावा. तसेच शेडमधील जमिनीवरही चुना भुरभुरल्यास शेळ्यांना बाहेरून येणाऱ्या रोगांचा कमीत कमी प्रादुर्भाव होईल.

मेंढ्यांतील व्यवस्थापन : कोकरे व मेंढ्यांना जुलाब झाल्यास तात्काळ औषध उपचार करावा. सहा महिन्यांचे कोकरांचे वजन घ्यावे. लोकर कातरणी करावी.

प्रती मेंढी ४०० ग्रॅम या प्रमाणात पौष्टिक आहार (पेंड) खाऊ घालावी.सर्व मेंढ्यांना नीलजिव्हा रोग प्रतिबंधात्मक लसीकरण करून घ्यावे.

## कापूस पिकातील रसशोषक किडींचे एकात्मिक नियंत्रण



कापूस पीक पेरणी होऊन १५ दिवसाच्या वर झाले आहे. किंवा काही शेतकऱ्यांची पेरणी अंतिम टप्प्यात असेल. कापूस पिकावर मावा, तुडतुडे, फुलकिडी, पिठ्या ढेकूण यासारख्या रस शोषणाऱ्या किडींचा मोठ्या प्रमाणात प्रादुर्भाव होऊ शकतो. जाणून घेऊ या कपाशीवरील रसशोषक किडींचे एकात्मिक नियंत्रण.

यांत्रिक पद्धत : शेताचे नियमित निरीक्षण करावे. रसशोषक किडींचा प्रादुर्भाव झालेली गळालेली पाते आणि बोंडे जमा करून नष्ट करावीत. शेताची कोळपणी व खुरपणी किंवा रासायनिक तणनाशकाचा वापर करून पिकाच्या सुरुवातीची ८ ते ९ आठवडे तणांचे व्यवस्थापन करावे. पीक २० दिवसाचे झाल्यावर शेतात पिवळे निळे चिकट सापळे लावावेत. एक हेक्टरसाठी १५ पिवळे व ५ निळे सापळे लावावे.

मशागतीय पद्धती :


नत्र खताचा अतिरिक्त वापर टाळावा. शिफारशीनुसार दोन ओळीतील व दोन रोपांतील अंतर ठेवावे. मित्र कीटकांचे संवर्धन होण्यासाठी मका, चवळी, उडीद, मूग यासारखी आंतरपिके, मिश्र पिके घ्यावीत. कपाशी पिकाभोवती झेंडू आणि एरंडी या सापळा पिकांची एक ओळ कडेने लावावी.

जैविक पद्धती : ढाल किडा म्हणजेच लेडीबर्ड बीटल या कीटकाचे प्रौढ व त्यांच्या अळ्या प्रामुख्याने मावा किडीवर जगतात. लेडी बर्ड बीटल पुरेशा प्रमाणात आढळून आल्यास रासायनिक कीडनाशकांचा वापर टाळावा. सिरफीड माशी, पेंन्टाटोमीड ढेकूण, कातीन, भुंगे, ड्रॅगनफ्लाय, रॉबर माशी, गांधील माशी, प्रार्थना कीटक, टॅकनिड माशी इ. मित्र किटकांचे संवर्धन करावे. ५% निंबोळी अर्काची किंवा ॲझाडिरेक्टीन दहा हजार पीपीएम १० मिली किंवा १५०० पीपीएम २५ मिलि प्रति १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. पिठ्या ढेकणासाठी व्हर्टिसिलीयम बुरशीची ४० ग्रॅम प्रति १० लिटर पाण्यामध्ये मिसळून फवारणी करावी.

रासायनिक नियंत्रण पद्धती :

निंबोळी तेल (५%) ५० मिली किंवा फ्लोनीकॅमीड (५०) २ ग्रॅम किंवा डायफेन्थुरॉन (५० ) १२ ग्रॅम किंवा फिप्रोनील ५ एस सी ३० मिली किंवा पायरीप्रोक्झीफेन (५%) + डायफेन्थुरॉन (२५% ) २० मिली वरीलपैकी कोणत्याही किडनाशकांची दिलेल्या प्रमाणात प्रति १० लिटर पाण्यातून फवारणी करावी.

## मार्केट मधील टॉप ५ दोडका बियाणे



शेतकऱ्यांनी दोडक्याची शास्त्रोक्त पद्धतीने लागवड केल्यास त्यांना या पिकापासून चांगले उत्पादन घेता येते. दोडक्यामध्ये व्हिटॅमिन सी, लोह, मॅग्नेशियम, थायामिन, रिबोफ्लेविन आणि जस्त भरपूर प्रमाणात असते. याशिवाय या मध्ये फायबरचे प्रमाण जास्त असते. शेतकऱ्यांनी दोडक्याच्या सुधारित वाणांची पेरणी केल्यास शेतकऱ्यांना यातून चांगला नफा मिळू शकतो.

दोडक्याच्या काही निवडक जाती :

१. पुसा नसदार – दोडक्याची ही एक सुधारित जात आहे. या जातीचे दोडके हे हलके हिरवे असतात. या जातीच्या दोडक्याच्या सालीवर फुगलेल्या नसा सारखा आकार असतो. या जातीचा आतील भाग पांढरा आणि हिरव्या रंगाचा असतो. तसेच या जातींचे दोडके हे १२–२० सें.मी. लांब असते. दोडक्याच्या या जातीचे उत्पादन हे चांगले लक्षणीय आहे. या जातीपासून ७०–८० क्विंटल प्रति एकरपर्यंत उत्पादन मिळू शकते.

२. सरपुटिया – दोडक्याची ही देखील एक सुधारित वाण आहे. या जातीची दोडके वेलीवर गुच्छांमध्ये लागतात. या जातीच्या दोडक्याचा लांबी हि इतर जातीपेक्षा लहान असते. या जातीच्या दोडक्यावर उंच पट्टे आढळतात. या जातीच्या दोडक्याची साल हि इतर जातीच्या दोडक्यापेक्षा अधिक जाड आणि मजबूत असते. दोडक्याची या जातीची लागवड जास्त करून मैदानी भागात आपल्याला अधिक पहावयास मिळेल.

३. पीकेएम १ – दोडक्याच्या सुधारित जातीपैकी एक जात म्हणजे पीकेएम १ ही एक जात. या जातीची दोडके हे चवीला चांगले चविष्ट असल्याचे सांगितले जाते. या जातीचे दोडके हे दिसायला खुपच सुंदर असतात हे प्रामुख्याने गडद हिरव्या रंगाचे असतात. दोडक्याच्या या जातीपासून २८०–३०० क्विंटल प्रति हेक्टर पर्यंत उत्पादन मिळू शकते. दोडक्याची ही जात १६० दिवसात काढणीसाठी तयार होते. या जातींचे दोडके हे पातळ, लांब, पट्टेदार आणि दिसायला किंचित वाकलेले असतात.

४. घिया – दोडक्याची ही एक सुधारित जात आहे. या जातीचे दोडके हे चांगले हिरवे असतात. दोडक्याच्या या जातीची भारतात मोठ्या प्रमाणात लागवड केली जाते, आणि या जातीची लागवड करून शेतकरी चांगली कमाई देखील करत आहेत. शेतकरी मित्रांनो या जातीच्या दोडक्याची साल हि पातळ असते. दोडक्याच्या या जातीमध्ये जीवनसत्वाचे प्रमाण चांगले मोठ्या प्रमाणात असते त्यामुळे याचे सेवन आरोग्यासाठी चांगले सांगितले जाते.

५. काशी दिव्या – दोडक्याच्या या जातीचे वेल ४.५ मीटर उंच असून फळे दंडगोलाकार असतात रंग हलका हिरवा असून लांबी २० ते २५ सें.मी. पेरणीनंतर ५० दिवसांनी पीक तयार होते. त्याची उत्पादन क्षमता १३०–१६० क्विंटल प्रति हेक्टर आहे.

६. नागा दोडका – दोडक्याच्या या जातीचा रंग हिरवा आणि लांबी २०–२५ सें.मी. पेरणीनंतर ५०–५५ दिवसांनी पीक काढण्यासाठी तयार होते. त्याची उत्पादन क्षमता देखील चांगली आहे. दोडक्याचे प्रति हेक्टरी २००–२२० क्विंटल उत्पादन मिळते.ओळीतील अंतर : ६–८ फूट; दोन रोपांमधील अंतर : ३ फूट ठेवावे.

७. पुसा स्नेहा – दोडक्याच्या या जातीचा रंग गडद हिरवा आणि लांबी २०–२५ सें.मी. पेरणीनंतर ५०–५५ दिवसांनी पीक काढण्यासाठी तयार होते. त्याची उत्पादन क्षमता देखील चांगली आहे. दोडक्याचे प्रति हेक्टरी २००–२३० क्विंटल उत्पादन मिळते.

८. स्वर्णप्रभा – या जातीला तयार होण्यास थोडा जास्त वेळ लागतो, परंतु उत्पादन चांगले मिळते. पेरणीनंतर ७०–७५ दिवसांनी पीक काढणी योग्य होते. प्रति हेक्टर उत्पादन क्षमता २००–२५० क्विंटल आहे.

९. कल्याणपूर ग्रीन स्मूदी – दोडकाच्या या जातीची फळे मध्यम आकाराची आणि मांसल असतात. फळांवर हलके पट्टे तयार होतात आणि दोडक्याच्या या जातीची उत्पादन क्षमता खूप जास्त असते. लुफा चे प्रति हेक्टरी ३५० ते ४०० क्विंटल उत्पादन मिळते.

## दिन विशेष

### महत्वाच्या घटना

१८०० : फोर्ट विल्यम कॉलेज ची स्थापना.
१८९० : वायोमिंग अमेरिकेचे ४४ वे राज्य बनले.
कॅलिफोर्नियातील डेथ व्हॅलीमध्ये तापमान १३४ अंश फूट (५७ अंश सेल्सिअस) पर्यंत वाढले, जे पृथ्वीवरील सर्वात उच्च तापमानाचे रेकॉर्ड आहे.
१९२३ : मुसोलिनीने इटलीतील सर्व राजकीय पक्षांवर बंदी घातली.
१९२५ : 'तास' या सोवियेत संघाच्या वृत्तसंस्थेची स्थापना
१९२५ : अवतार मेहेरबाबा यांनी आपल्या मौनव्रताची सुरूवात केली. हे व्रत त्यांनी सलग ४४ वर्षे त्यांच्या मृत्यूपर्यंत पाळले.
१९२५ : तास या सोवियेत संघाच्या वृत्तसंस्थेची स्थापना झाली.
१९४० : 'बॅटल्? ऑफ ब्रिटन' या नावाने ओळखले जाणारे हवाईयुध्द सुरू. नाझी जर्मन विमानदलाने इंग्लंडवर प्रचंड मोठया संख्येने विमाने पाठवून बॉबफेक सुरू केली. इंग्लिश हवाईदलाने जर्मनांचा यशस्वी प्रतिकार केला.
१९४७ : ब्रिटिश पंतप्रधान क्लेमंट ॲटली यांच्या शिफारशीवरून मुहम्मद अली जिना पाकिस्तानचे पहिले गव्हर्नर जनरल झाले.
१९६२ : 'टेलस्टार–१' हा पहिला अमेरिकन दळणवळण उपग्रह यशस्वीपणे अंतराळात प्रक्षेपित
१९७३ : पाकिस्तानच्या संसदेने बांगलादेशला मान्यता दिली.
१९७३ : बहामाजला (युनायटेड किंग्डमपासुन) स्वातंत्र्य मिळाले.
१९७८ : मॉरिटानियात लष्करी उठाव झाला.
१९७८: मुंबई येथे महात्मा फुले मागासवर्गीय विकास महामंडळ स्थापन करण्यात आले.
१९८३ : ब्रिटन मध्ये मार्गरेट थेचर यांची पंतप्रधान पदी पुन्हा नियुक्ती झाली.
१९९२ : मादक द्रव्यांच्या तस्करीबद्दल पनामाचे माजी राष्ट्राध्यक्ष मॅन्युएल नोरिएगा यांना फ्लोरिडात ४० वर्षांच्या तुरुंगवासाची शिक्षा झाली. नंतर ही शिक्षा कमी करुन ३० वर्षांची करण्यात आली.
१९९२ : संपूर्ण स्वदेशी बनावटीच्या 'इन्सॅट २ ए' या उपग्रहाचे फ्रेंच गयानातील कोउरू येथून प्रक्षेपण
१९९२ : आर्वी येथील 'विक्रम इनसॅट भू–केंद्र' राष्ट्राला अर्पण
१९९५ : म्यानमारमधील लोकशाही चळवळीच्या प्रणेत्या आंग सान सू क्यी यांची ६ वर्षांच्या नजरकैदेतून बिनशर्त मुक्तता
१९९९ : जिनिव्हा या ठिकाणी आंतरराष्ट्रीय श्रम संमेलनाची सुरुवात करण्यात आली.
२००० : नायजेरियात एका फुटलेल्या तेलवाहिनीत स्फोट होऊन गळणारे तेल गोळा करण्यासाठी आलेले २५० जण जळुन ठार झाले.
२००० : विज्ञानप्रसारासाठीच्या कार्याबद्दल नेहरू तारांगणातर्फे दिला जाणारा 'मनुभाई मेहता पुरस्कार' शास्त्रज्ञ वि. ग. भिडे यांना जाहीर
२००३ : अमेरिकेच्या नासा या अंतराळ संस्थेने मंगळावर पाठवलेले मंगळ यान रोवर मंगळ ग्रहावर यशस्वी उतरले.
२००५ : भारत आणि श्रीलंका देशादरम्यान शिक्षण आणि समुदाय विकासाशी संबंधित दोन करारांवर हस्ताक्षर करण्यात आले.

### जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१८५६ : वाय फाय प्रणालीचे जनक व अमेरिकन सर्बियन–अमेरिकन शोधक, इलेक्ट्रिकल अभियंता, मेकॅनिकल अभियंता निकोला टेस्ला यांचा जन्मदिन.
१८८८ : प्रसिद्ध भारतीय क्रांतिकारक व शिक्षणमंत्री महात्मा हंसराज यांचे पुत्र बलराज भल्ला यांचा जन्मदिन.
१९०३ : रा. भि. जोशी साहित्यिक (मृत्यू:)
१९१३ : पद्मा गोळे कवयित्री (मृत्यू: १२ फेब्रुवारी १९९८)
१९१४ : सुपरमॅन हिरो चे सहनिर्माते जो शस्टर यांचा जन्म. (मृत्यू: ३० जुलै १९९२)
१९२१ : स्माईली चे निर्माते हार्वे बॉल यांचा जन्म. (मृत्यू: १२ एप्रिल २००१)
१९२३ : गुरूनाथ आबाजी तथा जी. ए. कुलकर्णी साहित्य अकादमी पुरस्कार विजेते गूढकथालेखक (मृत्यू: ११ डिसेंबर १९८७)
१९३४ : पद्मभूषण विजेते जामखेड मॉडेल चे जनक डॉ. रजनीकांत आरोळे यांचा सुपे अहमदनगर येथे जन्म.
१९४० : लॉर्ड मेघनाद देसाई अर्थशास्त्रज्ञ आणि इंग्लंडच्या 'हाऊस ऑफ लॉर्डस'चे सभासद
१९४३ : आर्थर ॲश अमेरिकन टेनिस खेळाडू (मृत्यू: ६ फेब्रुवारी १९९३)
१९४५ : व्हर्जिनिया वेड इंग्लिश टेनिस खेळाडू
१९४९ : सुनील मनोहर तथा 'सनी' गावसकर क्रिकेटपटू व समालोचक
१९५० : 'बेगम' परवीन सुलताना पतियाळा घराण्याच्या शास्त्रीय गायिका
१९५१ : प्रसिद्ध भारतीय राजकारणी व उत्तरप्रदेश राज्याचे मुख्यमंत्री राजनाथ सिंह यांचा जन्मदिन.
१९८१ : राजीव गांधी खेल रत्न, अर्जुन पुरस्कार, व पद्मश्री पुरस्कार सास्न्मानीत पॅराॲथलेटिक्स पटू देवेंद्र झाझड़िया यांचा जन्मदिन.

### मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

१५५९ : हेन्री (दुसरा) फ्रान्सचा राजा (जन्म: ३१ मार्च १५१९)
१९६९ : डॉ. पांडुरंग सखाराम पिसुर्लेकर इतिहासकार (जन्म: ३० मे १८९४)
१९७० : आईसलँडचे पंतप्रधान ब्यार्नी बेनेडिक्ट्सन यांचे निधन.
१९७१ : भिखारी ठाकूर भोजपुरी भाषेचे 'शेक्सपिअर' (जन्म: १८ डिसेंबर १८८७)
१९८९ : प्रभाकर ऊर्ध्वरेषे साम्यवादी विचारवंत व साहित्यिक (जन्म:)
१९९५ : डॉ. रामकृष्ण विष्णू तथा 'दादासाहेब' केळकर 'गरिबांचे डॉक्टर' म्हणून प्रसिद्ध, स्वातंत्र्यवीर सावरकर यांच्या अभिनव भारत मंदिराचे अध्यक्ष (जन्म:)
२००० : भारतीय पत्रकार आणि राजकारणी वक्कम मजीद यांचे निधन. (जन्म: २० डिसेंबर १९०९)
२००५ : जयवंत कुलकर्णी (जन्म: ३१ ऑगस्ट १९३१)
२०१३ : भारतीय लेखक आणि शैक्षणिक गोकुलानंद महापात्रा यांचे निधन. (जन्म: २१ मे १९२२)
२०१४ : भारतीय अभिनेत्री, नृत्यांगना आणि नृत्यदिग्दर्शक जोहरा सेहगल यांचे निधन. (जन्म: २७ एप्रिल १९१२)

# केजमध्ये सापडले आयशरभरून मुंडके, हाडांचे सांगाडे

## बीडचे गोहत्या व गोतस्करीचे जाळे मुंबई-पुण्यापर्यंत पसरलेले-प्रशांत डोरले, किशन चौहाण

बीड । प्रतिनिधी

बीड जिल्ह्यात गोवंशाचे कत्तल होण्याचे प्रमाण वाढले असून, चोरट्या पद्धतीने गाय, बैल, कालवड, म्हैस सारख्या प्राण्यांची वाहतूक करून निर्मनुष्य ठिकाणी ही कत्तल करून गोमाता व गोवंशाचे सापळे, शिर, कातडी, हाडे, कातडी, सांगाडे इ. सह अन्य गोष्टी पुरावा सापडू नये म्हणुन नष्ट करण्याच्या उद्देशाने बीड शहराच्या सोबतच अन्य ग्रामीण परिसरात तसेच निर्मनुष्य भागात नेऊन विल्हेवाट लावण्याच्या उद्देशाने पुरण्यात येत आहेत. गेल्या काही दिवसांपूर्वीच बीड शहराच्या जवळ असलेल्या गोरे वस्ती, बांगरनाला परिसरात असेच २५ते३० गोवंशाची हत्या केलेली आढळून आलेली होती, यातील आरोपी निष्पन्न होऊन अटक होण्याच्या आधीच केज तालुक्यात दुसरी घटना घडल्याने प्रशासनाच्या कार्यपद्धतीवर संशय निर्माण होत आहे.

याबाबत सविस्तर वृत्त असे की, कालपरवा हिंदू धर्माच्या दृष्टीने पवित्र असलेल्या आषाढी एकादशीच्या दिवशी पहाटे दिनांक ०६ जुलै २०२५ बीड जिल्ह्यातील केज तालुक्यातील विडा ते शेंडी मार्गावर कारेगाव या ठिकाणी एक आयशर (ट्रक) भरून गोवंशाचे मुंडके हाडे जात असल्याची माहिती गोरक्षक केशव रत्नपारखे व अन्य यांना मिळताच तातडीने डायल ११२ वर कॉल करून माहिती देत गोरक्षकांनी ही गाडी अडवली असता यात अंदाजे ४००-५०० गाय, बैल, म्हैस, कालवड यांच्या कत्तल केल्याली असल्याचे प्राथमिक दिसून आले, प्रकरणाचे गांभीर्य ओळखत केज पोलिस स्टेशनचे पीआय उनवने साहेब यांच्या पथकाने तातडीने या ठिकाणी धाव घेत प्रकरणाची खातरजमा केली असता एक विटकरी रंगाचा आयशर टॅम्पो पासिंग क्रमांक १२३३४८ हा रोडच्या बाजूला ऊभा होता. त्याची पोलिसांनी तपासणी केली असता त्यामध्ये अवैधरित्या गायी, म्हसी व बैल यांचे हाडांचे सांगाडे, मुंडक्याच्या कवट्या, पायांचे सांगाडे मांस व हाडे असे भरलेले मिळून आले. सदर गाडी चालक नाव अकबर ईस्माईल टकारी वय ४५ वर्ष रा. रसुलपुरा ता. जि. धाराशिव व गाडी मालक अमीर ईस्माईल पठाण रा. रसुलपुरा धाराशिव याची गाडी असल्याचे सांगीतले. चालकाने सांगितले की, सदर माल हा धाराशिव येथुन तौफीक भाई खुरेशी रा. ख्वाजा नगर धाराशिव यांचेकडुन भरलेला आहे व नेकनुरचा अतिक रा. नेकनुर ता. बीड याच्याकडे माल घेऊन जात असल्याचे कबूल केले आहे सदर मालाची तपासणी पशु वैद्यकीय अधिकारी व पशुडॉक्टर यांनी पाहणी केली असता ५ टन वजनाचे गायी, म्हसी व बैल यांचे हाडांचे सांगाडे, मुंडक्याच्या कवट्या, पायांचे सांगाडे व मांस व हाडे असे एकूण ८,००,०००/- रु चा मुददेमाल मिळून आलेला आहे.यात केज पोलिसांनी दिलेल्या फिर्यादीनुसार १)अकबर ईस्माईल टकारी, वय ४५ वर्ष, २) अमीर ईस्माईल पठाण, दोन्ही रा. रसुलपुरा ता. जि. धाराशिव ३). तौफीक भाई खुरेशी रा. ख्वाजा नगर धाराशिव ४). अतिक रा. नेकनुर ता बीड यांचे विरुध्द प्राण्याचा छळ प्रतीबंधक अधिनीयम १९६० चे कलम ११ (१) () महाराष्ट्र पशु संरक्षण अधिनीयम १९७६ कलम ५ , महाराष्ट्र पोलीस अधिनीयम कलम ११९ प्रमाणे गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. परंतु या प्रकरणात मोठी साखळी असून याचे धागेदोरे हे बीड, धाराशिव, संभाजीनगर, मुंबई पुण्यासारख्या मोठ्या शहरांपर्यंत पसरलेले असून या आरोपींच्या सखोल चौकशी करून यांच्यामागे असलेल्या यांच्या टोळ्यांची माहिती घेऊन अश्या सर्व आरोपींवर मकोका व एमपीडिए कायद्याअंतर्गत कठोर शिक्षा करावी अशी मागणी संघ जागरण गटाचे किशन चौहाण, विश्व हिंदु परिषदेच्या वतीने प्रशांत डोरले, शिवप्रतिष्ठान हिंदुस्थानचे मयुर भालेकर, भगवाधारी ग्रुपचे कृष्णा जाधव यांच्यासह सर्व गोरक्षकांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे केली आहे.





### गोहत्याचे नेटवर्क बीडचे असल्याचे पुरावे

मुंबई येथील साकीनाका या परिसरात झालेल्या कारवाईमध्ये मोठ्या प्रमाणावर गोमांसाची कत्तल झाल्याचे पुरावे असून त्याचे कनेक्शन ही बीड जिल्ह्यातीलच असल्याचे चांदिवलीचे आ. दिलीप लांडे साहेब यांनी विधानसभा अधिवेशनात कालच तारांकित प्रश्न करत माहिती दिली आहे.

---

# दत्त संस्थान बालाघाट येथे गुरू पौर्णिमा

बीड । प्रतिनिधी



श्रीक्षेत्र कपिलधार पासून जवळच असलेल्या श्री.दत्त संस्थान बालाघाट कपिलधारवाडी (मांजरसुंबा) येथे प.पु.ष.ब्र.श्री १०८ शिवानंद शिवाचार्य महाराज तमलुरकर यांच्या कृपाशीर्वादाने व दत्त उपासक वैजिनाथ महाराज शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली दरवर्षीप्रमाणे याहीवर्षी बालाघाट डोंगर परिसरात श्री दत्त संस्थान कपिलधारवाडी (मांजरसुंबा) येथे गुरुवार दि. १० /०७/ २०२५ रोजी गुरु पौर्णिमा उत्सव व गुरू पूजन सोहळा आयोजित केला आहे.

तसेच संगीत भजनाचे आयोजन करण्यात आलेले आहे. या संगीत भजनामध्ये संगीत क्षेत्रातील मान्यवर व्यक्तींची हजेरी राहणार आहे. याबरोबरच गुरु पूजन सोहळा होणार आहे. यानंतर महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे. तरी या सर्व कार्यक्रमाचा लाभ पंचक्रोशीतील भाविक भक्तांनी घ्यावा असे संस्थांनचे दत्त उपासक वैजिनाथ महाराज शिंदे यांनी कळवले आहे.या गुरु पौर्णिमा उत्सवात अजब श्रीकृष्ण उद्धवराव यांची अन्नदान होणार आहे. तरी भाविक भक्तांनी महाप्रसादाचा लाभ घ्यावा.

---

# पोलीस अधीक्षक यांचे संकल्पनेतुन आरोपी अदान प्रदान करण्याची कारवाई सुरु

जालना । प्रतिनिधी

पोलीस अधीक्षक अजय कुमार बंसल यांचे पुढाकाराने शरिरा विरुध्दचे गंभीर गुन्हे, अवैध शस्व बाळगणे, अंमली पदार्थाची तस्करी, चोरी, घरफोडी, जबरी चोरी, महिला आत्याचार, सायबर गुन्हे या सदरा खाली जिल्ह्यात दाखल होणारे प्रत्येक गुन्ह्यातील आरोपीतांची अदान प्रदान कारवाई ५ जुलै रोजी पासून सुरु करण्यात आली आहे. ज्यात प्रामुख्याने जे आरोपी सतत शरिराविरुध्दचे व माला विरुध्दचे गंभीर स्वरुपाचे गुन्हे करतात, अवैध शस्त्र बाळगतात, अंमली पदार्थाची तस्करी विक्री करतात, चैन चोरी, मोबाईल चोरी, बंग लिफ्टींग, विनयभंग, बलात्कार, पोस्को व सर्व प्रकारच्या चोरी, घरफोडी, जबरी चोरी, दरोडा या गुन्ह्यात अटक पोलीस कोठडी व कारागृहातून मुक्त झ गलेले सर्व आरोपीतांची मागील सर्व गुन्ह्यांचा पुर्वेतिहास, त्याचे गुन्हा करण्याची पध्दत याची माहिती सह त्यास आठवड्याचे प्रत्येक शनिवारी पोलीस ठाणे प्रभारी यांचे व्हिडीओ कॉन्फरंस दरम्यान जिल्ह्यातील सर्व पोलीस ठाणे प्रभारी यांना दाखविण्यात येणार आहे. दर आठवड्याचे शनिवारी सर्व प्रभारी अधिकारी यांचेकडुन माहिती घेण्यात येणार आहे.



आठवड्यामध्ये अटक केलेले पोलीस कोठडी मधील आरोपी दुसऱ्या पोलीस ठाणे कडे अदान प्रदान कारवाई साठी हजर ठेवून जिल्ह्यातील सर्व पोलीस ठाणे प्रभारी अधिकारी यांना दाखविण्यात येणार आहे. ज्या पोलीस ठाणे अंतर्गत एक सारख्या गुन्हे करण्याच्या पध्दती (एम. ओ.बी.) व आरोपीचे गुन्हे करण्याचे क्षेत्र या बरुन त्यांना इतर पोलीस ठाण्यात तशा प्रकारचे गुन्हे दाखल असल्यास सदररील गुन्ह्या मध्ये हस्तांतरीत करुन घेण्यात येणार आहे. कारागृहातुन मुक्त झालेले आरोपी बाबत पुर्व इतिहास व त्यास दुसऱ्या पोलीस ठाणेस हवा असल्यास त्याची सुध्दा अटकेची कारवाई करुन जिल्ह्यातील इतर गुन्हे उघडकीस आणण्याचा प्रयत्न करण्यात येणार आहे. कारागृहात बंधीस्त असलेला आरोपी ट्रान्सफर बॉरंट घेऊन तपास करणे या बाबत. आरोपी ताबा घेणे बाकी आहेत अशा आरोपीची माहिती घेऊन त्यांना हवे असलेल्या गुन्ह्यात घेऊन त्यांची चौकशी करुन गुन्हा उघडकीस आणणचा प्रयत्न करण्यात येणार आहे. सक्रिय आरोपीतांचा अभिलेख अद्यावत करुन त्यांच्या सध्यस्थितीच्या हालचालीवर बारकाईने लक्ष ठेवून त्यांना गुन्हेगारी पासून रोखणे तसेच गुन्हा केल्यास तात्काळ अटक करुन त्यांचे वर कायदेशिर कारवाई करणे तसेच प्रभावी प्रतिबंधात्मक कारवाई करण्यात येणार आहे. अदान प्रदान साठी अभिलेखा वरील जेल रिलीज मोबाईल चोरी व सोनसाखळी चोरी करणारे आरोपीची माहिती घेण्यात येणार आहे. शनिवार दिनांक ०५.०७.२०२५ रोजी च्या अदान प्रदान दरम्यान जिल्ह्यातील अटक पोलीस कोठडी मधील जबरी चोरी चे (०३) घरफोडी (०३), चोरी (०३), शरिराविरुध्द गंभीर गुन्हे (०१) व पुर्वेतिहास असलेले आरोपी ज्यात अवैध शस्त्र बाळगणारे (०५), घरफोडी (०४), जबरी चोरी (०१), वाहन चोरी (०४) व शरिराविरुध्द चे (१२) असे एकूण ३६ आरोपीता बाबत माहिती देण्यात आली आहे. आरोपी अदान प्रदान या नाविण्यपूर्ण उपक्रमामुळे जिल्ह्यातील सराईत व अभिलेखा बरील गुन्हेगारावर वचक बसून गुन्ह्यांना आळा बसण्यास मदत होईल. गुन्हे उघडकीस आणण्याचे प्रमाणात वाढ होईल. सराईत गुन्हेगारांचे अभिलेख अद्यावत होऊन त्यांचे गुन्हा करण्याचे प्रवृत्तीस आळा बसेल.

---

# तांबारे यांची देशसेवा तरुणांसाठी प्रेरणादायी - प्रमोद पवळ



बीड । प्रतिनिधी

देश सेवा करणे हे प्रत्येकाचे कर्तव्य आहे असे असले तरी प्रमोद दत्तात्रय तांबारे यांनी सैन्य दलात प्रदीर्घ देश सेवा करून तरुणांसमोर एक आदर्श प्रस्थापित केला असल्याचे प्रतिपादन निवृत्त आदर्श शिक्षक मोहनराव पवळ यांनी केले. ते, गेवराई तालुक्यातील सिरसमार्ग येथे प्रमोद तांबारे यांची ग्रामस्थांच्या वतीने भव्य मिरवणूक काढण्यात आली याप्रसंगी बोलत होते.

यावेळी कल्याणराव पवळ, निवृत्त पोलिस उपअधीक्षक अच्युतराव पवळ, त्रिंबकराव तांबारे, बबन तांबारे, शरद तांबारे सर, शिक्षक भारतराव तांबारे, सचिन पवळ, सुभाषराव पवळ, शहाजीराव पवळ, दत्तात्रय तांबारे, दत्तात्रय रक्षे, विठ्ठलराव तांबारे, डॉ. रमाकांत कुंभार, अंकुश गडदे, पांडुरंग टाकसाळ, पत्रकार दिनेश गुळवे, सखाराम तांबारे, गंगा पोकळे, नितीन पवळ, योगेश तांबारे, निवृत्तीराव कोळेकर, गौतम पंडित आदींसह गावातील प्रतिष्ठित नागरिक, तरुण मोठ्या संख्येने उपस्थित होते. प्रमोद तांबारे यांनी सैन्य दलात अठरा वर्षे सेवा केली. ही देशसेवा करुन ते गावी परतले. गावात आल्यानंतर ग्रामस्थांच्या वतीने ढोलताशांच्या गजरात मिरवणूक काढण्यात आली. मिरवणूक दरम्यान ग्रामस्थांच्या वतीने ठिकठिकाणी तांबारे यांना औक्षण करून सत्कार करण्यात आला. यानंतर कल्याणराव पवळ यांच्या अध्यक्षतेखाली सेवानिवृत्ती गौरव सोहळा आयोजित करण्यात आला. यावेळी बोलताना मोहनराव पवळ सर म्हणाले, की देशसेवा करणे हे सर्वात महत्वाची सेवा आहे. प्रमोद यांनी अठरा वर्षे सेवा करुन तरुणांसमोर आदर्श निर्माण केला आहे. या सेवेमुळे आपल्या गावचा गौरव वाढल्याचेही ते म्हणाले. या सोहळ्यात सहभागी सर्व ग्रामस्थांचे आभार शिक्षक भारतराव तांबारे यांनी मानले.

---

# विनम्रता माणसाला मोठे बनवते- साळुंके

बीड । प्रतिनिधी



स्वराज्य नगर येथील ज्ञानेश्वरी भावकथा प्रवक्ते ह भ प माधव महाराज डाके यांच्याकडे काल दिनांक ७/७/२०२५ सोमवार पासून चातुर्मास उत्सवास प्रारंभ झाला .या चातुर्मास उत्सवात प्रति सोमवार ग्रंथराज ज्ञानेश्वरी प्रवचन सेवा आयोजित केली जाते .यावर्षीची पहिली प्रवचन सेवा ह भ प महादेव नाना साळुंके यांच्या सेवेने झाली. साळुंके महाराजांनी ग्रंथराज ज्ञानेश्वरी मधील पहिल्याच अध्यायातील देखा नवल तया प्रभूचे अद्भुत प्रेमभक्त चे या ओवीवर सविस्तर आणि मधुर प्रवचन सेवा संपन्न झाली. आपल्या सेवेमध्ये महाराजांनी विविध संदर्भ देऊन तुकाराम गाथा ग्रंथातील प्रमाण देऊन भक्त आणि देव यांच प्रेम किती अद्भुत आहे हे सांगितलं. आपल्या भक्तासाठी प्रत्यक्ष भगवंत कोणतेही काम न सांगता स्वतः करतो व आपल्या पाठीशी उभा राहून भक्ताचे आलेलं संकट दूर करण्याचे काम करतो असे विशद केले .

आपल्या जीवनामध्ये ज्ञानेश्वरी ग्रंथ हा विनम्रता आणते, जीवनामध्ये विनम्रता माणसाला मोठे बनवते. याबरोबरच ज्ञानेश्वरी शी समरस झालं की आपल्या जीवनात आनंदाला भरती येते .ज्ञानेश्वर महाराज व ग्रंथराज ज्ञानेश्वरी ग्रंथ हा सर्वांना सुख समाधान व आत्मशांती देणारा ग्रंथ आहे असे साळुंके महाराजांनी आपल्या प्रवचन सेवेच्या पहिल्या सत्रामध्ये विशद केले. या प्रवचन सेवेमध्ये महाराजांनी आपल्या जीवनामध्ये प्रेम ठेवा, अहंकार सोडा आणि विनम्रता ठेवा यामुळे आपल्या जीवनाला चिंता किंवा दुःख करण्याची गरज पडणार नाही .सदैव आनंदी राहण्याचा एकमेव मार्ग म्हणजे ज्ञानेश्वरी शी समरस होणे होय असे महाराजांनी सांगितले. या कार्यक्रमाला स्वराज्य नगर मधील असंख्य भक्त उपस्थित होते यामध्ये ह भ प मुकुंद काका भुतपल्ले , गणेश शेंडगे, जीवन चव्हाण याबरोबरच स्वराज्य नगर मधील मंडळी उपस्थित होती. शेवटी सामुदायिक पसायदानाने प्रवचन सेवेची सांगता होऊन सर्वांनी प्रसाद घेतला.

---

# महिलांसाठी पंडित दीनदयाळ उपाध्याय रोजगार मेळावा

बीड । प्रतिनिधी

बेरोजगार महिला उमेदवारांना रोजगाराची संधी उपलब्ध व्हावी, यासाठी कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्रामार्फत शुक्रवार, ११ जुलै रोजी सकाळी १० ते दुपारी दोन वेळेत रोजगार मेळाव्याचे आयोजन केल्याचे केंद्राचे सहायक आयुक्त सुशील उचले यांनी सांगितले. या संधीचा पात्र उमेदवारांनी लाभ घ्यावा, असे आवाहनही त्यांनी केले.

नगर रोडवरील चंपावती शाळेच्या पाठीमागे असलेल्या शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था, (मुलींचे) येथे मेळावा होईल. यामध्ये नांमाकित कंपनी,आस्थापनाच्या वतीने महिलांना रोजगाराची संधी मिळावी, यासाठी मुलाखतींचे आयोजन केलेले आहे. मेळाव्यास येताना आवश्यक कागदपत्रे सोबत आणावी. काही अडचणी असल्यास जयदत्त इंगोले यांना ९८२२७८१८७६ या भ्रमणीध्वनी क्रमांकावर संपर्क साधावा. बीड येथे गुरुकुल इंग्लिश स्कूल येथे प्राथमिक शिक्षकाची एकूण पाच पदे आहेत. त्यासाठी डी.एड, बी.एड (इंग्रजी) आणि वयोमर्यादा-२५ ते ३५ असावी. एलआयसीमध्ये विमा सखीचे २० पदे असून पात्रता १० वी किंवा १२ वी, वयोमर्यादा-१८ ते ४५, समर्थ नर्सिंग स्कूल येथे टयूटरची चार पदे असून पात्रता बीएससी नर्सिंग, वयोमर्यादा १८ ते ३०, एस.जी सॉफ्टवेअर सोल्यूशन येथे ऑफिस मॅनेजर पदाची चार पदे असून पात्रता १२ वी, पदवी आणि वयोमर्यादा १८ते ३०, टाटा लाईफ इन्शुअरंस येथे लीडर अ‍ॅन्ड अ‍ॅडव्हायजरची २५ पदे असून पात्रता दहावी किंवा १२ वी असावी, असेही कळविण्यात आले आहे.

---

# भारत बंदला लिंबागणेशकरांचा पाठिंबा



लिंबागणेश । प्रतिनिधी

केंद्र सरकारच्या कामगार विरोधी, शेतकरी विरोधी आणि भांडवलदार धार्जिण्या धोरणांचा निषेध करण्यासाठी आज दि.९ जुलै बुधवार रोजी १० केंद्रीय कामगार संघटनांनी एकत्र येऊन विविध शेतकरी आणि ग्रामीण कामगार संघटनांच्या समन्वयाने देशव्यापी संप पुकारत ''भारत बंद'' ची हाक दिली असुन याला प्रतिसाद देत बीड तालुक्यातील लिंबागणेश ग्रामस्थांनी या भारत बंदला पाठींबा देत छत्रपती शिवाजी महाराज चौकात गावच्या मुख्य प्रवेशद्वारावर केंद्र सरकारच्या विरोधात '' कामगार आणि शेतकरी विरोधी धोरणे राबविणा-या सरकारचा धिक्कार असो, कामगार एकजुटीचा विजय असो, शेतकरी एकजुटीचा विजय असो अशी घोषणाबाजी करत निदर्शने करण्यात आली.

यावेळी सामाजिक कार्यकर्ते डॉ . गणेश ढवळे,सेवा सोसायटी चेअरमन रविंद्र निर्मळ, अ‍ॅड.गणेश वाणी, विक्रांत वाणी, ग्रामपंचायत सदस्य श्रीहरी निर्मळ, दामोदर थोरात, रमेश गायकवाड, अशोक जाधव, पांडुरंग वाणी,सुरेश निर्मळ, भालचंद्र गिरे,आश्रुबा गिरे, सतिश वायभट, संजय घोलप, चिंतामण ढास, गणपत घोलप, बालाजी निर्मळ,सय्यद अख्तर, संजय पावले, जनार्दन भोसले, अंकुश गायकवाड, ज्ञानोबा निर्मळ, बाजीराव दशमे,शेषेराव तागड, हरिभाऊ कदम,बाळु सोनावणे, चोखोबा निर्मळ, जनार्दन वाणी , सर्जेराव घरत, बाबासाहेब वायभट, भास्कर वाणी आदी सहभागी होते.

यावेळी लिंबागणेश पोलिस चौकीचे सहाय्यक फौजदार बाबासाहेब राख, गोविंद बडे,पो.ह. सतिश राऊत आणि सुदाम शेलार यांची उपस्थिती होती.

केंद्र सरकारच्या कमाल शेतजमीन धारणा (सिलिंग ) कायदा ,आवश्यक वस्तू कायदा, जमिन अधिग्रहण कायदा या नरभक्षी शेतकरी विरोधी कायद्यांमुळे शेतकरी आत्महत्यांचे प्रमाण वाढले आहे.तर कामगार संघटनांनी संसदेने मंजूर केलेल्या ४ कामगार संहितेवर तिव्र आक्षेप घेतला असुन या संहितामूळे कामगारांचे हक्क कमकुवत होत असुन कामगार संघटनांची ताकद कमी होत असल्याचा दावा केला आहे. केंद्र सरकारच्या कामगार आणि शेतकरी विरोधी आणि भांडवलदार धार्जिण्या धोरणांचा लिंबा गणेश करांमध्ये तिव्र संताप असुन याविरोधात निदर्शने करत ''भारत बंद'' ला समर्थन असल्याचे डॉ.गणेश ढवळे यांनी म्हटले आहे.

---

# 'विकसित महाराष्ट्र २०४७' साठी सर्वेक्षणामध्ये नागरिकांनी मत नोंदवावे जिल्हाधिकारी जॉन्सन

बीड । प्रतिनिधी

'विकसित महाराष्ट्र २०४७' चे व्हिजन डॉक्युमेंट तयार करण्यासाठी विविध १६ क्षेत्र निहाय नागरिकांचे मत, अपेक्षा, आकांक्षा व प्राथम्यक्रम जाणून घेण्याच्या दृष्टीने राज्यव्यापी नागरिक सर्वेक्षण करण्यात येणार आहे. नागरिकांनी उपलब्ध करुन देण्यात आलेल्या क्युआर कोडवर आपले मत नोंदवून विकसित महाराष्ट्राच्या संकल्पनेमध्ये योगदान द्यावे. या सर्वेक्षणामध्ये नागरिकांची कोणतीही वैयक्तिक माहिती संकलित करण्यात येणार नाही. भारत सरकारकडून स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवानिमित्त भारताला सन २०४७ पर्यंत विकसित भारत -भारत२०४७ करण्याचा संकल्प करण्यात आला आहे. महाराष्ट्र राज्याची अर्थव्यवस्था सन २०२९ पर्यंत १ ट्रिलियन डॉलर व सन २०४७ पर्यंत ५ ट्रिलियन डॉलरपर्यंत पोहोचविणे हे राज्याचे ध्येय आहे. राज्याच्या ध्येयाची पूर्तता करण्याच्या दृष्टीने तसेच प्रत्येक क्षेत्राचा ठसा राज्याच्या अर्थव्यवस्थेवर उमटावा यासाठी विकसित महाराष्ट्र २०४७ चे व्हिजन जाहीर करण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी ६ मे २०२५ ते २ ऑक्टोबर २०२५ या कालावधीत १५० दिवसाच्या कार्यक्रमाची घोषणा केली आहे.

या कार्यक्रमामध्ये व्हिजन डॉक्युमेंट तयार करण्याचा समावेश करण्यात आला आहे. व्हिजन डॉक्युमेंट तयार करताना दीर्घकालीन, मध्यमकालीन व अल्पकालीन अशी टप्पानिहाय उद्दिष्टे ठेवण्याचे निर्देश सर्व विभागांना देण्यात आले आहेत. व्हिजन डॉक्युमेंटचा आराखडा तयार करण्यासाठी १६ संकल्पनांवर आधारीत क्षेत्रनिहाय गट बनविण्यात आले आहेत. यामध्ये कृषि, शिक्षण, आरोग्य, ग्राम विकास, नगर विकास, भूसंपदा, जलसंपदा, पायाभूत सुविधा, वित्त, उद्योग, सेवा, सामाजिक विकास, सुरक्षा, सॉफ्ट पॉवर, तंत्रज्ञान व मानव विकास, मनुष्यबळ व्यवस्थापन असे क्षेत्रनिहाय गट असतील. या सर्व गटांनी प्रगतीशील, शाश्वत, सर्वसमावेशक व सुशासन यावर आधारित आराखडा तयार करावयाचा आहे. आराखडा तयार करताना त्या-त्या क्षेत्रातील तज्ज्ञ व्यक्ती, शासकीय, अशासकीय संस्थांशी सल्लामसलत करण्यात येणार आहे.विकसित महाराष्ट्राच्या व्हिजनमध्ये नागरिकांचे मत, अपेक्षा, आकांक्षा व प्राथम्यक्रम जाणून घेण्याच्या दृष्टीने राज्यव्यापी नागरिक सर्वेक्षण अभियानाचे उद्घाटन मुख्यमंत्री यांनी १७ जून, २०२५ रोजी केले आहे. सर्व आयुक्त, जिल्हाधिकारी, मुख्य कार्यकारी अधिकारी पासून गावपातळीवरील कार्यालय प्रमुखांनी सर्वेक्षणामध्ये आपले अभिप्राय नोंदवावेत यासाठी दर्शनी भागावर फलक लावावेत, असे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले आहेत. यामध्ये नागरिकांनी उपलब्ध करुन देण्यात आलेल्या क्युआर कोडवर आपले मत नोंदवून विकसित महाराष्ट्राच्या संकल्पनेमध्ये योगदान द्यावे. या सर्वेक्षणामध्ये सहभाग घेतलेल्या नागरिकांची कोणतीही वैयक्तिक माहिती संकलित करण्यात येणार नाही.

---

# अनुदानापासून वंचित राहिलेले शेतकऱ्यांची याद्या तात्काळ सादर करा-तहसीलदार चव्हाण

अंबड । प्रतिनिधी



तालुक्यात वर्ष २०२४ मध्ये झालेल्या अतिवृष्टीमुळे बांधीत शेतकऱ्यांना संदर्भीय शासन निर्णयानुसार अनुदान मंजूर करण्यात आले आहे. ज्या शेतकऱ्यांना अनुदान मिळाले नाही त्यांच्या याद्या तहसील कार्यालयात सादर करण्याचे निर्देश तहसीलदार विजय चव्हाण यांनी दिले आहेत.

आजपर्यंत ग्राम महसूल अधिकारी यांनी सजातील खातेदार यांच्या याद्या अपलोड करण्यासाठी तहसील कार्यालयात दाखल करण्यात आलेल्या आहे. परंतु अनेक सजेतील लाभार्थी अनुदानापासून वंचित अथवा अनुदान याद्या अपलोड करण्यासाठी सादर केले नाहीत, अशा लाभार्थीच्या याद्या येत्या १५ जुलै पर्यंत तात्काळ विनाविलंब कार्यालयास सादर कराव्यात. जेणे करुन सदर लाभार्थी याच्या अनुदान याद्या डीबीटी पोर्टलवर अपलोड करुन लाभार्थी यांना अनुदान वितरण करण्यात येईल. यासाठी ग्राम महसूल अधिकारी यांनी शिल्लक राहीलेले लाभार्थी यांच्या याद्या लिल्या मुदतीत सादर न केल्यास आपल्या सजेतील लाभार्थी अनुदानापासून वंचित त राहीले नाहीत असे गृहीत धरून अनुदान वाटपाचा अहवाल जिल्हाधिकारी यांना सादर करण्यात येईल, असे तहसीलदार श्री विजय चव्हाण यांनी सांगितले.

# जात-धर्म नको, शेजारी शेतकरी आहे म्हणून मैत्री करा

## तहसीलदार सुरेश घोळवे यांचे तिंतरवणीत अवाहन

शिरूर । शंकर भालेकर

समाजामध्ये जात आणि धर्मवादाचा तेड दिवसेंदिवस वाढत असून आपल्या शेजाऱ्याबद्दल शेतकरी उदासीन होताना दिसत आहेत. शेती विकसित करण्यासाठी जात धर्म कामी येत नसून शेजारी शेतकऱ्यांबरोबर केलेली मैत्री कामी येते म्हणून शेतकऱ्यांनी जात धर्माचा विचार न करता शेतकरी म्हणून आपल्या शेजाऱ्याशी मैत्री करण्याचे अवाहन शिरूरचे तहसीलदार सुरेश घोळवे यांनी तिंतरवणी येथे केले आहे.

शिरूर कासार तहसील महसूल विभागाच्या वतीने तालुक्यातील तिंतरवणी येथील दक्षिण मुखी हनुमान मंदिराच्या प्रांगणामध्ये तहसीलदार सुरेश घोळवे यांच्या अध्यक्षतेखाली मंगळवार दि.८ जुलै रोजी छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व अभियानाच्या शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिराच्या माध्यमातून महसूल विभागाच्या अधिकारी - कर्मचाऱ्यांनी संवाद साधून शेतकऱ्यांनी आपल्या शेतातील तंटे संपवून प्रगतीच्या दिशेने मार्गक्रमण कशा पद्धतीने करावे या संदर्भात मार्गदर्शन केले आहे. तर अध्यक्षपदावरून मार्गदर्शन करताना तहसीलदार सुरेश घोळवे यांनी छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व अभियानाचा मुख्य उद्देश काय आहे. या अभियानाच्या माध्यमातून शेतकऱ्यां मध्ये लागलेले वाद, तंटे मिटवण्यासाठी प्रशासन कशा पद्धतीने काम करतं याची सविस्तर माहिती दिली. वारसाचा फेर, वाटणी पत्रक, खरेदी खत आदींची सविस्तर माहिती देऊन याविषयीचे तंटे कोणत्या स्तरावर मिटवले जातात. कोणते तंटे न्यायालयीन प्रविष्ट असतात आणि कोणते तंटे प्रशासनाला सोडवता येतात याबद्दलची येथोचित माहिती दिली. त्याचबरोबर अलीकडच्या काळामध्ये मोठ्या प्रमाणामध्ये उद्भवणारे प्रश्न म्हणजे शेतातील रस्ते हे असून शेतकऱ्यांनी नकाशाचा अभ्यास करून शेतातील शेत रस्ते खुले करून द्यावेत

पान ३ वर

### तहसीलदारच्या हस्ते ग्रामपंचायतची वृक्षारोपण

तहसीलदार सुरेश घोळवे यांच्या अध्यक्षतेखाली छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व अभियानाचे शिबिर आयोजित करण्यात आले होते. याचे औचित्य साधून सरपंच उद्धव (बापू )खेडकर यांनी गावामध्ये रस्त्यालगत मंदिर परिसरामध्ये तहसीलदार सुरेश घोळवे यांच्या हस्ते आंब्याच्या झाडांचे वृक्षारोपण करून घेऊन एक सामाजिक संदेश दिला आहे.

### मान्यवरांच्या हस्ते शालेय दाखल्यांचे वितरण

या शिबिराच्या माध्यमातून तहसीलदार घोळवे यांनी शेतकऱ्यांच्या मुलांची विविध दाखले, प्रमाणपत्र वितरित निराधार लाभार्थ्यांच्या अडचणी समजून घेऊन गोरगरीब जनतेला, लाभार्थ्यांना लाभ मिळवताना त्रास होणार नाही याची काळजी घेण्याची प्रशासकीय कर्मचाऱ्यांना आदेश दिले आहेत.







बीड -भाजपचे जेष्ठ नेते ऍड सर्जेराव तांदळे यांची भाजपा राज्य परिषदेवर नियुक्ती झाल्यानिमित्त चंद्रकांत फड यांनी त्यांचा रुद्राक्ष व कैलाशपती झाडांचे रोप देऊन हृदय पूर्ण सत्कार केला. याप्रसंगी गोपाळ बाप्पा धांडे यांच्यासह कार्यकर्ते उपस्थित होते.

# स्पर्धकामुळे उर्जा निर्माण होते -नवनीत कॉंवत

## पालकांचे छत्र हरवलेल्या ८०० विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचा आधार

अंबाजोगाई । प्रतिनिधी

जीवनात यश प्राप्त करण्यासाठी निंदक किंवा स्पर्धक असले पाहिजेत, त्यांच्यामुळे आपल्यात यश प्राप्त करण्याची जिद्द व उर्जा निर्माण होते. असे प्रतिपादन पोलिस अधीक्षक नवनीत कॉंवत यांनी विद्यार्थ्यांना उद्देशून येथे केले.

आधार माणुसकीच्या उपक्रमांतर्गत पालकांचे छत्र हलवलेल्या ८०० विद्यार्थ्यांनाउ मान्यवरांच्या हस्ते स्कूलकिट व मातांना साडीचोळीची भेट देण्यात आली. त्याप्रसंगी नवनीत कॉंवत बोलत होते. प्रसिध्द व्याख्याते इंद्रजित देशमुख, आयआरएस अधिकारी नितिका विलाश, ठाणे येथील विद्यार्थी विकास योजनेचे संचालक अरुण करमरकर, पोलिस उपअधिक्षक अनिल चोरमले, डॉ. सुनिता बिराजदार, गंगा माऊली शुगरचे उपाध्यक्ष हनुमंतकाका मोरे, केएसबीएल ग्रुपचे संचालक शेख शकील बागवान, अर्थवेल पतसंस्थेचे संस्थापक बालासाहेब माने, उद्योजक सरला मर्लेचा, जाधव कोचिंग क्लासेसच्या संचालक ज्योती जाधव, सहशिक्षक स्नेहा लोमटे, आरोग्य अधिकारी डॉ. आशा मारवाले (जुने), डॉ. अश्विनी साबळे यांची प्रमुख उपस्थिती होती.



आपल्या जीवनातील अनुभव सांगताना कॉंवत म्हणाले, की सैनिकी शाळेत शिक्षण घेतच वडिलांनी दहावीसाठी दिलेले टार्गेट आपण साध्य करण्याच्या दृष्टीने आपण प्रयत्न केले, आणि ते साध्य केले. पुढे हाच अनुभव प्रत्येक ध्येय साध्य करण्यात उपयोगी पडला. आयआयटी होऊन चांगल्या पॅकेजची नोकरी लागलेली असताना यात आपण देशाच्या

पान ३ वर

# सुरूमगांव येथील गोदावरी नदी पात्रातून अहोरात्र वाळू उपसा

माजलगाव । प्रतिनिधी

तालुक्यातील सुरूमगाव येथील गोदावरी नदी पात्रातून दिवस रात्र अवैध वाळू उत्खनन करून वाहतूक केली जात आहे. त्यांना ना महसूलचे भय आहे, ना पोलिसांचे.या अवैध वाळू तस्करांविरुद्ध माजलगाव महसूल व पोलीस प्रशासन कारवाई करत नसल्याने शासनाचा लाखोंचा महसूल बुडत आहे. महसूल व पोलीस यांची भूमिका संशयास्पद असून, याकडे वरिष्ठांनी लक्ष देण्याची गरज आहे. याबाबत माजलगावचे तहसीलदार संतोष रूईकर यांच्याशी संपर्क साधला असता संपर्क झाला नाही. सुरूमगावातुन वारेमाप अवैध वाळू वाळूचा उपसा सुरू आहे.रात्रभर वाळू उपसा सुरू असल्याने वाहानांच्या आवाजाने रस्त्या जवळील ग्रामस्थांची झोप उडाली आहे.तस्करां विरुद्ध कारवाई करावी, अशी मागणी सरपंच शिवकुमार माने यांच्यासह ग्रामस्थांकडुन होत आहे.



### तहसील प्रशासनाची जाणीवपूर्वक दुर्लक्ष

मागील तहसीलदार वर्षा मनाळे यांच्या कार्यवाही नंतर मात्र काही दिवसापासून दिवसाढवळ्या गोदापात्रात अवैध वाळू उत्खनन व वाहतूक होत असल्याचे सरपंच शिवकुमार माने यांनी सांगितले.

# कामगार विरोधी चार श्रमसंहीता कायदा व जनसुरक्षा विधेयक रद्द करा-शिवाजी कुरे

माजलगाव । प्रतिनिधी

सिटू संघटनेच्या वतीने बीड जिल्हा उपाध्यक्ष शिवाजी कुरे यांच्या नेतृत्वाखाली विविध मागण्या बाबत माजलगाव उपविभागीय कार्यालयावर दि ०९ जुलै बुधवार रोजी मोर्चा काढण्यात आला.

केंद्र सरकारने प्रचलित कामगार कायदे बदलून त्याचे रुपांतर चार श्रमसंहीता कायद्यात केले आहे त्यामुळे कामगारांच्या मुलभूत हक्कांवर गदा आली आहे.हे कायदे भांडवलदारांच्या बाजूने असल्यामुळे देशातील कामगार असुरक्षित झाला आहे.त्यामुळे देशातील सर्व कामगार संघटनांनी एकत्र येऊन या कायद्याची अंमलबजावणी करु नये यासाठी दि ०९ जुलै बुधवार रोजी एक दिवसीय संप पुकारला होता.महाराष्ट्र सरकारने लोकशाही विरोधी जनसुरक्षा विधेयक आणले आहे. त्यालाही सर्व संघटनांनी एकत्र येऊन विरोध केला आहे.योजना कर्मचाऱ्यांना वेळेवर मोबदला मिळत नाही गेल्या सहा महिन्यांपासून थकलेला मोबदला मिळालेला नाही त्यामुळे त्यांच्यावर उपासमारीची वेळ आली आहे.त्यामुळे सरकारने कामगार विरोधी धोरणे रद्द करावीत,दरमहा पगार वेळेवर देण्यात यावा, कामगारांना शासकीय सेवेत दाखल करून घ्यावे,भांडवलदार धार्जिने धोरणे रद्द करण्यात यावी अशा विविध मागण्या करण्यात आल्या.मोर्चात शिवाजी कुरे, अशोक पोपळे, विनायक पौळ, उर्मिला शेंडगे,अर्चना पांचाळ,उषा औसे, सय्यद फारूख, मुसद्दीक बाबा, सय्यद रज्जाक, बळीराम भुमे, आसाराम राठोड, चंदाराणी झुटे, कृष्णा सोळंके, सुभाष डाके,पवन चिंचणे इत्यादी उपस्थित होते




# डॉक्टर्स सुपर मेलोडियस व्हाईस गीतगायन स्पर्धेत अंबाजोगाईचे डॉ.राजेश इंगोले यांना प्रथम पारितोषिक

## तब्बल ६०० डॉक्टर्स गायकांचा ऑनलाईन स्पर्धेत सहभाग

अंबाजोगाई । प्रतिनिधी

डॉक्टर्स सुपर मेलोडियस व्हाईस ऑनलाईन गीतगायन स्पर्धेत अंबाजोगाईचे सुप्रसिद्ध मानसोपचार तज्ज्ञ तथा गायक डॉ.राजेश इंगोले यांना प्रथम क्रमांकाचे पारितोषिक प्राप्त झाले आहे. त्याबद्दल सर्वस्तरांतून डॉ.इंगोले यांचे अभिनंदन होत आहे. यापूर्वी ही अष्टपैलू व्यक्तिमत्त्व असलेल्या डॉ.इंगोले यांनी विविध क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी केली आहे. ते विविध पुरस्कारांचे व पारितोषिकांचे मानकरी ठरले आहेत.

राष्ट्रीय पातळीवर हि गीतगायन स्पर्धा फक्त डॉक्टर्ससाठी आयोजित करण्यात येते. ही स्पर्धा ऑनलाइन घेण्यात येते. या स्पर्धेमध्ये तब्बल ६०० डॉक्टर्स गायकांनी सहभाग नोंदवला. या स्पर्धेमध्ये डॉ.राजेश इंगोले यांनी आपल्या बहारदार गीत गायनाद्वारे परीक्षकांना

पान ३ वर



# तीन महिन्यांचे पगार थकीत, सबस्टेशन मधील यंत्र चालकांवर उपासमारीची वेळ

माजलगांव । प्रतिनिधी

माजलगांव तालुक्यातील सब डिव्हीजनच्या अधिपत्याखाली बाह्य स्त्रोत (आऊटसोर्स) यंत्रचालक गेल्या तीन महिन्यांपासून वेतन न मिळाल्यामुळे आर्थिक संकटात सापडले आहेत.एप्रिल,मे आणि जून या सलग तीन महिन्यांचे पगार थकीत आहेत. अहोरात्र काम करूनही पैसे न मिळाल्यामुळे त्यांच्यावर उपासमारीची वेळ आली आहे.लोकशाहीत ही लाजिरवाणी गोष्ट आहे.

अशी भावना कामगारांमध्ये निर्माण झाली आहे.

कामगारांनी यापूर्वीच लेखी निवेदनाद्वारे अधिकार्यांचे लक्ष वेधले असुनही ठोस उपाययोजना झालेली नाही.संबधित ठेकेदाराकडून सोमवार पर्यंत होईल, उद्या होईल असे खोटे दिलासे दिले जात आहेत.पण किती दिवस उलटून गेले तरी वेतन मिळालेले नाही.अशी कामगारांची तक्रार आहे.संपर्क पोर्टल द्वारे थेट वेतन अदा करावे कामगारांची मागणी या पार्श्वभूमीवर कामगारांनी आता वेतन प्रक्रियेत पारदर्शकता यावी यासाठी महावितरणच्या संपर्क पोर्टल द्वारे थेट वेतन अदा करावे अशी ठाम मागणी केली आहे.या पोर्टल मुळे. प्रत्येक महिन्याला वेळेवर पगार होईल.अनथा अन्यथा आंदोलन करुन असा इशारा दिला आहे.

# रोडागिरी बाबांचा गुरुवारी यात्रोत्सव

म्हसोबावाडी । प्रतिनिधी

आष्टी तालुक्यातील हिवरा दादेगाव डोंगरगण भोजेवाडी या गावचे श्रद्धास्थान व ग्रामदैवत समजले जाणाऱ्या रोडागिरी बाबांचा यात्रा उत्सव गुरुवार दि. १० रोजी मोठ्या उत्साहात संपन्न होणार आहे. सालाबादप्रमाणे याही वर्षी निसर्गरम्य डोंगर माथ्यावर असलेल्या दर्गाह परिसरात हिंदू मुस्लिम बांधव मोठ्या सलोख्याने एकत्रित येऊन हा उत्सव साजरा करत असतात. बाबांच्या दर्शनासाठी मुंबई ,कल्याण,पुणे तसेच तालुक्यातून मोठ्या संख्येने भाविक हजेरी लावतात.



हिरव्यागार वनराईने नटलेला हा परिसर यात्रेप्रसंगी गर्दीने फुललेला असतो. गाड्यांची पार्किंग व्यवस्था केलेली आहे. रंगरंगोटी सह विद्युत रोशनाई देखील करण्यात आली आहे. यात्रेनिमित्त मोठ्या श्रद्धेने भाविक दिवसभर यात्रेचा आनंद लुटतात. दिवसभर चार गावच्या मानाच्या काठ्यांची मिरवणूक लेझीम खेळत, ढोल - ताशा सह हलगीच्या गजरात निघते. तिन्ही गावच्या फुलांच्या चादर चढवल्या जातात. दुसऱ्या दिवशी गावभरात शेरणी वाटली जाते. मोठ्या प्रमाणात पोलीस बंदोबस्त ठेवला जातो. जागृत दर्गाह म्हणून भाविक येथे नवस करतात. पूर्वी एकेश्वरवादाचा प्रचार व प्रसार करत भारतभर भ्रमण करणाऱ्या सुफी संतांपैकीच

पान ३ वर

# आष्टी तालुक्यातील निराधाराचे पैसे दुसऱ्याच्याच खात्यात पडत असल्याची माहिती? योजनेच्या नियमांचे उल्लंघन

## कलेक्टर साहेब निराधारांच्या आधार क्रमांकाची पडताळणी होणे नितांत गरजेचे

**आष्टी । प्रतिनिधी**

**आष्टी तालुक्यात निराधार असलेल्या लोकांचे डिबीटीने हाल के ले. अजतगायत अर्ध्याच निराधारांची डिबीटी झाली असताना आता एका निराधाराचे पैसे दुसऱ्याच्याच खात्यात जमा होत असल्याची माहिती सुत्रांकडून मिळत आहे.**

आष्टी तालुक्यात तहसील कार्यालयाचे लॉगीन सेतुसूविधा केंद्रांना दिले आहे. असे देता येते का? यामुळे निराधारांचे खुप हाल चालु आहेत. सेतुसूविधा केंद्रांमार्फत केवळ दहा टक्के सुद्धा डिबिटीची कामे झाले नाहीत. यामध्ये निराधारांना नाहक अर्थिक पिळवणूकीला सामोरे जावे लागत आहे. सेतुसूविधा केंद्रांमार्फत घेण्यात आलेले असंख्य अर्जच बाद झाल्याने निराधारांचे डिबीटीचे कामे झाले नाहीत. आणि निराधारांना आर्थिक फटकाही बासला याला जबाबादार कोण? जर दुसऱ्याच्या खात्यात लाभार्थ्याचे पैसे जात असतील तर योजनेचा उद्देश सफल होत नाही, आणि गरजू व्यक्ती लाभापासून वंचीत राहते. गेल्या आठ महिन्यांपासून डिबीटी न झालेल्या निराधांना अद्याप मानधन मिळालेलेच नाही. निराधार हे सकाळी दिवस उगवताच सेतुसूविधा केंद्राकडे व तहसील कार्यालयाचे उंबरे झिजवताना दिसत आहेत. निराधारांची सध्या ससेहोलपट चालू आहे. त्यांची गत न घरका ना घाटका झाली आहे. प्रशासन सुद्धा या विषयाला गांभीर्याने हाताळताना दिसत नाही. कित्येक गावांमध्ये कॅप घेण्यात आले होते. या कॅपमध्ये सुद्धा काहीच हेतू साध्य झाला नाही. दुसऱ्याच्या खात्यात पैसे जात असल्याचे हे एकच प्रकरण समोर आले आहे. असे किती प्रकरण असतील हेही बघणे नितांत गरजेचे आहे. लाभार्थ्यांच्या नावाखाली असी शासनाची फसवणूक होत असेलच यात काही शंका नाही. असे प्रकार केव्हापासून घडत आहेत याची तपासणी व्हावी. व संबंधीतांवर कारवाई करण्यात यावी असे बोलले जात आहे.

# लिंगायत समाज स्मशानभुमीची उपजिल्हाधिकाऱ्यांकडे मागणी; तातडीने समस्या सोडविण्याची गरज

**अंबाजोगाई । प्रतितिधी**

**येथील लिंगायत समाज स्मशानभुमिची मागणी करणारे निवेदन उपजिल्हाधि काऱ्यांना देण्यात आले. सोमवारी लिंगायत समाजातील विविध उपजाती - जमाती मधील नागरिकांनी एकत्रित येऊन लिंगायत स्मशानभुमिसाठी पाच एकर जागा देण्याची मागणी केली.**

येथील लिंगायत समाजाची स्मशानभुमि शहराच्या उत्तरेला बाराखांबी ( सकलेश्वर मंदिर ) जवळ आहे . परंपरागत रितीने येथे समाजातील मृत पार्थिवाचा दफनविधी करण्यात येतो . यापूर्वी शासनाने याच भागात दोन एकर जागा स्मशानभुमिसाठी उपलब्ध करून दिली . त्याच ठिकाणी दफनविधी करण्यात येतात . परंतु शासनाच्या पुरातत्व विभागाने सकलेश्वर मंदिर परिसरात उत्खनन केले . तेथील परिसर राखीव क्षेत्र जाहीर केले असल्यामुळे लिंगायत समाजाला अंत्यविधी साठी जागा अपुरी पडू लागली . तेथे अंत्यविधी साठी विरोध करण्यात येतो .त्यामुळे स्मशानभुमिचा प्रश्न ऐरणीवर आला. लिंगायत समाजाच्या वतीने अनेकवेळा शासन दरबारी निवेदने परंतु अद्यापही उपयोग झाला नाही . शहरातील लिंगायत समाजाच्या वाढत्या लोकसंख्येनुसार स्मशानभुमिची जागा देण्याची मागणी वारंवार करण्यात आली . लिंगायत बांधवांनी एकजुटीने लढा उभारण्याचा निर्धार केला आहे . या प्रसंगी एस . आर . बुरांडे , डॉ निशिकांत पाचेगावकर , श्रीकांत ढेले, माणिक बुरांडे , बाळासाहेब राऊत, ओम खंदारे, डॉ संतोष कडगे , शैलेश स्वामी , गणेश टुरके , दिलीप बुरांडे, दिलीप दामा, बाबासाहेब बुरांडे, ॲड .अनिल व्यवहारे , गणेश टुरके , अशोक खंदारे, बसलिंगअप्पा हरंगुळे, विश्वनाथ बुरांडे, संजय बुरांडे, वाघमारे, राऊत , उमा अण्णा शेटे, शुभन वारद शिवकुमार निर्मळे व इतर नागरिक उपस्थित होते.



This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Ashok Nagorao Khade. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड-४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक-सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक - अशोक नागोराव खाडे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल - rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

# पुणे कृषी उत्पन्न बाजार समितीत घोटाळा; पणन संचालकांचे चौकशीचे आदेश



पुणे कृषी उत्पन्न बाजार समितीतून धक्कादायक माहिती समोर आली आहे. समितीच्या कामकाजात गंभीर अनियमितता झाल्याचा संशय व्यक्त केला जात आहे. या संदर्भात पणन संचालकानी सखोल चौकशीचे आदेश दिले आहेत. या चौकशीसाठी विशेष चौकशी समिती नेमण्यात आली असून १ एप्रिल ते सात जुलै या कालावधी झालेल्या सर्व व्यवहारांची आणि कागदपत्रांच पडताळणी करण्यात येणार आहे. चौकशीसाठी एकूण ५१ महत्त्वपूर्ण मुद्दे निश्चित करण्यात आले आहेत.

पणन संचालक विकास रसाळ यांनी पुणे ग्रामीणचे जिल्हा उपनिबंधक प्रकाश जगताप यांची अधिकृत अधिकारी म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. जगताप यांच्या सहकार्यासाठी संजय कृष्णा पाटील, दिगंबर हौसारे, विजय सावंत, सुनील धायगुडे आणि सुनील जाधव यांचाही चौकशी समितीत समावेश करण्यात आला आहे. या प्रकरणातील संभाव्य आर्थिक गैरव्यवहार, नियमभंग, कंत्राट प्रक्रियेमधील अपारदर्शकता आणि प्रशासनातील त्रुटी यांचा चौकशीचा भाग म्हणून अभ्यास केला जाणार आहे. चौकशीचा अहवाल पुढील काही आठवड्यांत सादर होण्याची शक्यता आहे.

समितीच्या चौकशीत वाहनतळ शुल्क वसुली गोंधळ, डमी अडत्यांकडून होणारी दुबार विक्री, कर चुकवेगिरी, नोटरी करार, अनधिकृत बांधकामे, अतिक्रमण यामाध्यमातून होणारी बेकायदेशीर वसुली, बनावट पावत्या पुस्तके, वापरण्यात आल्याचा संशय व्यक्त केला जात आहे. याशिवाय परदेशी चायनीज भाज्यांची वाढती आवक आणि त्यावरील उपकर टाळ्याचे प्रकारही उघडकीस आले होते. या सर्वांची चौकशी केली जाणार आहे.

दरम्यान, गेल्या काही महिन्यांपासून बाजार समितीने पूर्वीच्या काही आदेशांकडे दुर्लक्ष केल्याचे निदर्शनास आले होते.यात वाहनतळ व सुरक्षा रक्षक निविदा, शेतीमालाच्या नोंदी, यांसारख्या मुद्द्यांचा समावेश आहे. त्यामुळे आता समितीच्या मालमत्ता वापर, उत्पन्न-खर्चातील विसंगती, कंत्राटी व्यवहारातील पारदर्शकता, कर्मचारी भरती, बांधकामे, करार यात स्वतंत्र तपास होणार आहे.

या संदर्भात राज्यमंत्री माधुरी मिसाळ यांनी बाजार समितीच्या कारभारावर आक्षेप घेत, समिती बरखास्त करण्याची मागणी मुख्यमंत्र्यांकडे केली होती. त्यांच्या तक्रारीनंतर चौकशीला गती मिळाली असून, सध्या समितीच्या कार्यपद्धतीतील अपारदर्शकतेबाबत वाढत्या तक्रारी प्रशासनाच्या लक्षात आल्या आहेत. ५१ महत्त्वपूर्ण मुद्द्यांवर आधारित तपासणी सुरू असून, एप्रिल २०२३ ते जुलै २०२५ या कालावधीतील व्यवहारांची छाननी करण्यात येत आहे. चौकशी अहवालानंतर दोषींवर कठोर कारवाई होण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

# जांबूत परिसरात बिबट्याची दहशत कायम; नागरिक भयभीत

जांबूत : शिरूर तालुक्यातील जांबूत परिसरात बिबट्याचा मानवी वस्तीवरील उपद्रव थांबण्याचे नाव घेत नाही. गेल्या दोन दिवसांत पाळीव प्राण्यांवरील हल्ल्याच्या घटनांमुळे नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण पसरले आहे. बिबट्याच्या दहशतीपासून मुक्ती मिळावी, यासाठी वनविभागाने तातडीने पिंजरे लावावेत, अशी मागणी नागरिक करत आहेत.

जांबूत-फाकटे रस्त्यावरील जोरीवस्ती येथे संतोष पांडुरंग जोरी यांच्या पाळीव कुत्र्यावर संध्याकाळी उजेड असताना घराशेजारी दबा धरून बसलेल्या बिबट्याने प्राणघातक हल्ला केला. नागरिकांच्या तत्परतेमुळे आणि कुत्र्याच्या गळ्यातील लोखंडी बेल्टमुळे कुत्रा थोडक्यात बचावला. दुसऱ्या घटनेत दशरथ जोरी यांच्या घराशेजारी सकाळी बिबट्याने उकिरड्यावर कोंबडीवर झडप घालून तिला ठार केले. तसेच, बाबाजी मारुती जोरी यांच्या गोठ्यावर दोन बिबट्यांनी हल्ल्याचा प्रयत्न केला, पण जाळीच्या कंपाऊंडमुळे हल्ला अयशस्वी झाला.




जांबूत परिसरात बिबटे भक्ष्याच्या शोधात मानवी वस्ती, घरांचे अंगण आणि शेतांच्या कडेला बिनधास्त फिरताना दिसत आहेत. यामुळे शेतकऱ्यांना जीव मुठीत धरून शेतीची कामे करावी लागत आहेत. गेल्या काही वर्षांत बिबट्याच्या हल्ल्यात अनेक दुर्दैवी मृत्यू झाले असून, लहान मुले, पशुधन आणि पाळीव प्राण्यांवरील हल्ल्यांच्या घटना वाढल्या आहेत. तरीही वनविभागाकडून ठोस उपाययोजना होत नसल्याने नागरिकांमध्ये नाराजी आहे.

नागरिक संतोष पांडुरंग जोरी म्हणाले, वनविभागाने आमच्या सुरक्षेकडे दुर्लक्ष करू नये. बिबट्याच्या भीतीमुळे भीतीचे वातवरण आहे. हल्ल्यांचे गांभीर्य लक्षात घेऊन तातडीने पिंजरे लावावेत. वनविभागाने संवेदनशीलतेने आणि जबाबदारीने काम करावे, अशी मागणी जोरीवस्तीतील नागरिकांनी केली आहे.

# बाणेर अग्निशामक केंद्र अखेर सुरू




**पुणे । प्रतिनिधी**

बाणेर-बालेवाडी परिसरातील नागरिकांसाठी अत्यंत गरजेचे असलेले अग्निशमन केंद्र अखेर अखेर सुरू झाले आहे. या भागातील वाढती लोकसंख्या, उंच इमारतींची संख्या आणि आपत्ती अथवा अपघाताच्या वाढत्या शक्यता लक्षात घेता, फायर स्टेशन ही प्राथमिक आणि अपरिहार्य गरज होती. नागरिकांच्या सुरक्षिततेसाठी ही सुविधा अत्यावश्यक होती. अखेर सात वर्षानंतर हे केंद्र सुरू झाले आहे. २०१८-१९ मध्ये प्रत्यक्ष बांधकामाला सुरुवात झाली आणि दीड वर्षांपूर्वीच हे काम पूर्णत्वास आले होते. मात्र प्रशासकीय पातळीवरील विलंबामुळे सुविधा सुरू होण्यास वेळ लागला.

या केंद्रात अत्याधुनिक अशा उंच शिडीच्या २ अग्निशामक गाड्या (फायर व्हेईकल्स), तसेच अधिकारी व कर्मचारीवर्ग यांचीही पूर्ण उपलब्धता प्रशासनाने करून दिली आहे. या भागात एकही केंद्र नसल्याने २०१५ मध्ये माजी नगरसेवक अमोल बालवडकर यांनी वेळोवेळी आंदोलने केली होती. तसेच २४ डिसेंबर २०२४ रोजी महापालिका आयुक्तांची भेट घेऊन फायर स्टेशन तातडीने सुरू करण्याची मागणी माजी नगरसेवक अमोल बालवडकर यांनी केली होती. त्यानंतर संबंधित विभागांमार्फत त्वरीत कार्यवाही झाल्यानंतर अखेर ही सुविधा सुरू करण्यात आली असल्याने बालवडकर यांनी सांगितले.

# हिंजवडी : महापारेषणच्या भूमिगत वीज वाहिनीत बिघाड; आयटी हब अंधारात

हिंजवडी । प्रतिनिधी

महापारेषणच्या इन्फोसिस ते पेगासस २२० केव्ही अतिउच्चदाब भूमिगत वीज वाहिनीत रविवारी (दि. ६) दुपारी मोठा बिघाड झाल्याने माण, मारुंजी, नेरे, जांबे, कासारसाई आणि आयटी हबमधील सहा गावे अंधारात गेली आहेत.

या बिघाडामुळे महावितरणच्या ९१ उच्चदाब ग्राहकांसह १२ हजार लघुदाब ग्राहकांचा वीजपुरवठा पूर्णपणे खंडित झाला असून, २४ तास उलटूनही अनेक भाग अंधारातच आहेत. यामध्ये आयटी पार्क, एमआयडीसी, डॉहलर कंपनी, रायसोनी पार्क आणि विप्रो सर्कल परिसराचा समावेश आहे.

महापारेषणकडून रविवारी सकाळी नियोजित देखभाल दुरुस्ती करण्यात आली होती. मात्र, वीजपुरवठा पूर्ववत करताना दुपारी २.१० च्या सुमारास भूमिगत वीज वाहिनीत तांत्रिक बिघाड झाला. यामुळे २२ केव्हीच्या २५ वाहिन्याही ठप्प झाल्या.महावितरणकडून पर्यायी मार्गाने वीजपुरवठा पूर्ववत करण्यासाठी युद्धपातळीवर प्रयत्न सुरू असून, तब्बल ६३ मेगावॅटहून अधिक भार दुसऱ्या वाहिन्यांमार्गे वळविण्यात येत आहे.

दरम्यान, पिण्याचे व वापराचे पाणी बंद असल्यामुळे रहिवाशांना मोठ्या अडचणींना सामोरे जावे लागत आहे. नागरिकांनी महावितरणला सहकार्य करावे, असे आवाहन प्रशासनाने केले आहे.

# मेट्रोच्या ताफ्यात लवकरच १२ नवीन ट्रेन

**पुणे । प्रतिनिधी**

पुणे मेट्रोच्या विस्तार प्रकल्पांतर्गत पीसीएमसी ते निगडी आणि स्वारगेट ते कात्रज या दोन मार्गांसाठी लवकरच १२ नवीन मेट्रो ट्रेन सेट पुणे मेट्रोच्या ताफ्यात दाखल होणार आहेत. या १२ नव्या ट्रेनसाठी टीटागढ रेल सिस्टिम लिमिटेड आणि टीटागढ फिरेमा या कंपन्यांना एकत्रितपणे ४३०.५३ कोटी रुपयांची खरेदी ऑर्डर देण्यात आली आहे.

प्रत्येक मेट्रो ट्रेन सेटमध्ये तीन डबे असतील. हे सर्व ट्रेन सेट पूर्णतः मेक इन इंडिया उपक्रमांतर्गत तयार करण्यात येणार असून, त्यांचे उत्पादन अल्युमिनियमपासून केले जाणार आहे. या ट्रेनही सध्याच्या मेट्रो ट्रेनप्रमाणे वातानुकूलित असतील. स्वयंचलित दरवाजे, उद्घोषणा आणि डिजिटल डिस्प्ले यांसारख्या आधुनिक सुविधा यात राहणार आहेत.

पीसीएमसी ते निगडी या मार्गिकेचे काम सध्या वेगाने सुरू असून, स्वारगेट- कात्रज मार्गासाठी लवकरच ठेकेदारांची नेमणूक करण्यात येणार आहे. या दोन्ही मार्गांसाठी आवश्यक असणाऱ्या नव्या ट्रेन सेटसाठी महा मेट्रोने आधीच खरेदी प्रक्रिया पूर्ण केल्याने, बांधकाम पूर्ण होताच सेवा सुरू करणे शक्य होईल, असे महा मेट्रोचे व्यवस्थापकीय संचालक श्रावण हर्डीकर यांनी सांगितले.



या नवीन ट्रेन सेटचे उत्पादन टप्प्याटप्प्याने केले जाणार असून, येत्या ३० महिन्यांच्या कालावधीत ते पुणे मेट्रोकडे प्रत्यक्ष उपलब्ध होतील. सध्या मेट्रोकडे ३४ ट्रेन सेट आहेत. नव्या १२ ट्रेन आल्यावर पुणे मेट्रोकडे एकूण ४६ ट्रेन सेट असतील.

# तुळशीबाग गणेशोत्सव मंडळाचा सामाजिक उपक्रम: आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या मुलांच्या शिक्षणासाठी पाठबळ




पुणे: गणेशोत्सव कार्यकर्त्यांवरील टीका चुकीची असून, त्यांच्या रचनात्मक कार्याला समाजाने पाठिंबा द्यावा, असे आवाहन उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांनी केले. मानाचा चौथा गणपती श्री तुळशीबाग गणेशोत्सव मंडळाने समाजातील वंचित विद्यार्थ्यांसाठी केलेल्या कार्याचे कौतुक करत, त्यांच्या उपक्रमांना शासन नेहमीच खंबीरपणे साथ देईल, असे त्यांनी सांगितले.

तुळशीबाग मंडळाच्या शतकोत्तर रौप्य महोत्सवी वर्षानिमित्त, भोई प्रतिष्ठानच्या पुण्यजागर प्रकल्पांतर्गत नांदेड जिल्ह्यातील आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या मुलांच्या शिक्षणासाठी शुल्काचा धनादेश चंद्रकांत पाटील यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. याप्रसंगी मंडळाचे स्वागताध्यक्ष कृष्णकुमार गोयल, अध्यक्ष विकास पवार, उपाध्यक्ष विनायक कदम, कोषाध्यक्ष नितीन पंडित, भोई प्रतिष्ठानच्या पुण्यजागर प्रकल्पाच्या समन्वयक गीतांजली देगावकर, पल्लवी वाघ, दिनेश शहा आदी मान्यवर उपस्थित होते.

मंडळाचे कोषाध्यक्ष नितीन पंडित म्हणाले, बळीराजावर आत्महत्येची वेळ येणे हे महाराष्ट्रासारख्या पुरोगामी राज्यासाठी दुर्दैवी आहे. या मुलांच्या शिक्षणासाठी महागणपतीचा आशीर्वाद कायम राहील. हा कार्यक्रम पाटील यांच्या निवासस्थानी आयोजित करण्यात आला असून, यात मंडळाचे विश्वस्त साईनाथ डोंगरे, चकोर सुबंध, प्रतीक इस्रे, गणेश रामलिंग, अभिजीत वाळके आणि सौरभ कदम यांनी पुढाकार घेतला. या उपक्रमाने तुळशीबाग मंडळाने सामाजिक बांधिलकीचा आदर्श घालून दिला असून, इतरांनीही अशा कार्यात सहभागी होण्याची गरज आहे.

# मोटेवाडीतून १ लाख ४० हजारांचे डाळिंब चोरीला; शिरूर तालुक्यातील तिसरी घटना

निमोणे - शिरुर तालुक्याच्या पूर्व भागातील मोटेवाडी गावातील शेतकरी संदीप दौलत येलभर यांच्या डाळिंबाच्या शेतातून सरासरी १ लाख ४० हजार रुपये किंमतीचे सुमारे १४०० किलो डाळिंब चोरीला गेल्याची घटना उघडकीस आली आहे. याप्रकरणी येलभर यांनी शिरूर पोलीस स्टेशनमध्ये तक्रार दाखल केली आहे.



संदीप येलभर यांची मोटेवाडी येथे २ एकर डाळिंब बाग आहे. सोमवार (दि.८) रोजी पहाटे येलभर हे शेतीत पाहणीसाठी गेल्यावर मोटरसायकलजवळ दोन भरलेल्या व पाच मोकळ्या डाळिंबाच्या गोण्या आढळल्या. यावेळी त्यांनी गावातील इतर नातेवाईकांना व मुलांना घटनास्थळी बोलावून घेतले. झाडांवर फळे कमी असल्याचे निदर्शनास आल्याने चोरीचा ठोस संशय निर्माण झाला. चोरट्यांनीच ही रात्रीच्या वेळी चोरी केल्याचा संशय येलभर यांनी व्यक्त केला आहे. शिरुर पोलीस स्टेशनच्या पथकाने घटनास्थळी पाहणी केली.

शेतकऱ्यांची चिंता वाढली

घटनेने शिरुर तालुक्यातील डाळिंब उत्पादक शेतकरी चिंताग्रस्त झाले असून तालुक्यात महिनाभरात डाळिंब चोरीची ही तिसरी घटना आहे. आधी उरळगाव येथे ७ लाखांचे, शिंदोडी येथे ४ लाख ५० हजारांचे आणि आता मोटेवाडी येथे १. ४० हजारांचे डाळिंब चोरीला गेले आहे. दहिवडी गावात शेतकऱ्याच्या सतर्कतेमुळे डाळिंब चोरीचा प्रयत्न फसला होता. त्यामुळे शिरुर तालुक्यात पुन्हा एकदा शेतीमाल चोरीच्या घटनांबाबत चिंता निर्माण केली आहे. पोलिसांनी चोरांवर तत्काळ कारवाई करावी, अशी मागणी शेतकऱ्यांतून होत आहे.

# शिरूर तालुक्यात लंपी रोगाचे थैमान; शेतकऱ्यांकडून नुकसानभरपाईची मागणी

**शिरूर । प्रतिनिधी**

**शिरूर तालुक्यातील अनेक गावांमध्ये लंपी स्किन रोगाने गोवंश जनावरांवर मोठ्या प्रमाणात आघात केला आहे. शेतकऱ्यांच्या उपजीविकेचा आधार असलेल्या जनावरांचे आजार आणि मृत्यूमुळे शेतकरी हवालदिल झाले आहेत. सरकारी पशुवैद्यकीय सेवा आणि वैद्यकीय अधिकाऱ्यांचे दुर्लक्ष यामुळे शेतकऱ्यांमध्ये तीव्र नाराजी पसरली आहे.**

उपचारातील अडथळे आणि शेतकऱ्यांचे गाऱ्हाणे

गावांमध्ये सरकारी पशुवैद्यकीय डॉक्टर वेळेवर उपलब्ध होत नसल्याची तक्रार शेतकरी करत आहेत. खासगी डॉक्टरांकडून उपचार करूनही रोग नियंत्रणात येत नसल्याचे शेतकरी निवृत्ती (नाना) काळोखे यांनी सांगितले. त्यामुळे पशुवैद्यकीय विभागाने तातडीने घरोघरी सर्वेक्षण करून रोगग्रस्त जनावरांवर त्वरित उपचार सुरू करावेत, अशी मागणी ग्रामस्थांनी केली आहे.

नुकसानभरपाईची मागणी

लंपी रोगामुळे जनावरे दगावलेल्या शेतकऱ्यांना शासनाने तातडीने नुकसानभरपाई द्यावी, अशी मागणी सरपंच, ग्रामसेवक आणि शेतकरी यांनी लावून धरली आहे. जनावरांचा मृत्यू शेतकऱ्यांचे आर्थिक गणित बिघडवत असल्याने नुकसानभरपाई ही काळाची गरज बनली आहे.

प्रशासनाकडून तातडीने उपाययोजनेची अपेक्षा

या संकटावर मात करण्यासाठी सरपंच, ग्रामसेवक आणि पशुवैद्यकीय अधिकाऱ्यांनी एकत्र येऊन तातडीने उपाययोजना राबवाव्यात, असे आवाहन शेतकऱ्यांनी केले आहे. याबाबत लवकरात लवकर बैठक घेऊन परिस्थितीचे गांभीर्य वरिष्ठ अधिकाऱ्यांपर्यंत पोहोचवणे आवश्यक आहे.

एकीचे आवाहन

लंपी रोग केवळ जनावरांपुरता मर्यादित नसून, शेतकऱ्यांचे आर्थिक नुकसान करणारा आहे. त्यामुळे शासन, प्रशासन आणि ग्रामपंचायतींनी एकजुटीने काम करून या संकटाचा सामना करणे गरजेचे आहे.

# गर्लफ्रेंडला रबडी खायला दिली अन् बॉयफ्रेंडचा भयानक कांड समोर

पुणे : पुण्यातून एक धक्कादायक घटना समोर आली आहे. यामध्ये गर्लफ्रेंडला रबडीमधून गर्भपाताची गोळी दिल्याचा प्रकार समोर आला आहे. एका तरुणाने लग्नाचे आमिष दाखवून तरुणीसोबत वारंवार शारिरिक संबंध ठेवले, यातून तरुणी गर्भवती राहिली. या घटनेमुळे तरुण घाबरला त्याने एक प्लॅन तयार केला. या तरुणीचा तिच्या नकळत गर्भपात घडवून आणला.

तरूणाने नेमके काय केले?

बॉयफ्रेंड एक दिवस त्याच्या गर्लफ्रेंडसाठी रबडी घेऊन आला, पण या रबडीमध्ये त्याने गर्भपाताची गोळी टाकली होती. बॉयफ्रेंडने रबडीमध्ये गर्भपाताची गोळी टाकली आहे, हे गर्लफ्रेंडला माहिती नव्हतं, त्यामुळे तिने रबडी खाल्ली आणि तिचा गर्भपात झाला. पिंपरी-चिंचवडच्या हिंजवडी पोलीस ठाण्याच्या हद्दीमध्ये हा प्रकार घडला आहे. याप्रकरणी आदर्श वाल्मीक मेश्राम याच्याविरोधात हिंजवडी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, २८ वर्षीय पीडित तरुणीने सोमवारी हिंजवडी पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली. आदर्श मेश्रामने तरुणीला लग्नाचे आमिष दाखवून तिच्यासोबत वारंवार शारीरिक संबंध प्रस्थापित केले, त्यातून ती गर्भवती राहिली. गर्भधारणा समजताच आदर्शने तिच्या नकळत आणि संमतीशिवाय रबडीत गर्भपाताची गोळी मिसळून तिला खाऊ घातली, ज्यामुळे तिचा गर्भपात झाला. यानंतर आदर्शने लग्नास नकार दिला. फसवणूक झाल्याचे लक्षात येताच तरुणीने पोलिसांत तक्रार दाखल केली. हिंजवडी पोलीस या प्रकरणाचा सखोल तपास करत असून, आरोपीविरुद्ध कठोर कारवाईचे संकेत दिले आहेत.

# कचऱ्यासंदर्भात जनजागृती; रॅलीद्वारे ‘स्वच्छ वाघोली’चा संदेश

वाघोली । प्रतिनिधी

वाघोलीतील गणेश नगर परिसरात ‘स्वच्छ वाघोली, हरित वाघोली’ या संकल्पनेतून एक प्रभावी कचरा जनजागृती रॅली नुकतीच भाजपा युवा मोर्चाचे पुणे जिल्हाध्यक्ष संदीप सातव यांच्या पुढाकाराने उत्साहात पार पडली.

परिसरातील नागरिकांनी या उपक्रमात मोठ्या संख्येने सहभाग घेत आपली सामाजिक जबाबदारी पार पाडली आणि स्वच्छ वाघोली या मोहिमेला बळकटी दिली. या रॅलीचे प्रमुख उद्दिष्ट परिसरात स्वच्छतेबाबत जागृती निर्माण करणे, रस्त्यावर कचरा टाकणे टाळणे, कचर्‍याची योग्य विल्हेवाट लावणे, ओला व सुका कचरा वेगवेगळा करणे तसेच कचरा थेट मनपाच्या घंटागाडीत टाकणे हे होते.



‘आपला परिसर स्वच्छ ठेवूया, रोगराई टाळूया!’ असा सामूहिक संकल्प यावेळी करण्यात आला. रॅलीच्या माध्यमातून नागरिकांना स्वच्छतेचे महत्व पटवून देत एक सकारात्मक सामाजिक संदेश देण्यात आला. या उपक्रमामुळे वाघोलीतील स्वच्छता मोहिमेला नवी ऊर्जा मिळाली आहे.

‘स्वच्छ वाघोली’ ही केवळ जनजागृती मोहीम नसून नागरिकांच्या सहभागातून घडणारी एक सामाजिक चळवळ आहे. अशाच जनहिताच्या उपक्रमांमधून सकारात्मक बदल घडतो असतो. रॅलीमध्ये नागरिकांनी उत्स्फूर्त सहभाग घेतला आहे.

-संदीप सातव, जिल्हाध्यक्ष, भाजप युवा मोर्चा पुणे